

आनंद सागर
मंगल कार्यालय
शाकाहारी करिता
एका मंगलमय कार्यासाठी लागणारी सर्व प्रकारची सेवा एकाच छताखाली. आता आनंद सागर मंगल कार्यालय येथे रात्रीच्या कार्यक्रमासाठी भव्य लॉन्स उपलब्ध.
* लग्न सोहळा * साखरपूडा * रिसेप्शन * वाढदिवस
* गेट टुगेदर * कॉन्फरन्स * सांस्कृतिक कार्यक्रम
आसना बायपास चौरस्ता, गोरक्षण, जवळ, देशमुख गॅस पंपासमोर कामठा (बु.) नांदेड
व्यवस्था: स्वागत मंडप डेकोरेटर्स, मो. 9325610507,7972904719



# गोदातीर समाचार

स्थापना-१९६२

RNI No.6331/62
REGD.NO. G2/RNP/NND-27/2024-2026

संपादक : केशव घोणसे पाटील
www.godateer.com



जोशी बंधू यांचे ..!!
शंकर भट्ट मंगल कार्यालय

मंगल कार्यासाठी लागणारी सर्व प्रकारची सेवा एकाच छताखाली आपल्या सेवेत..!!
(लग्न, साखरपुडा, मुंज, रिसेप्शन, वाढदिवस, बारसे, डोहाळ जेवण, स्वागत समारोह व ईतर...)
पत्ता : भगवान परशुराम चौक किनवट रोड भोकर मो. क्र.
9765983335/9960659975/9881881934/9527889927



* वर्ष ६४ वे * अंक १५० * नांदेड * शुक्रवार, दि. ६ जून २०२५ * पृष्ठे ६ * किंमत २ रुपये ☎: 255777, Fax :252211


# मुंबई महापालिका वगळता अन्यत्र चार सदस्यीय प्रभाग रचना

**मुंबई (प्रतिनिधी)–** सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका घेण्याची प्रक्रिया राज्य निवडणूक आयोगाने सुरू केली आहे. मुंबई महापालिका वगळता राज्यातील इतर सर्व महापालिकांच्या निवडणुका बहुसदस्यीय प्रभाग पद्धतीने होणार आहेत. त्यासाठी मविआ सरकारच्या काळातील तीन सदस्यीय प्रभाग रचना पद्धती रद्द करून महायुती सरकारने पुन्हा चार सदस्यीय प्रभाग रचनेला पसंती दिल्याने पुन्हा प्रभाग रचना होणार आहे.

कोरोना महामारी, ओबीसींचे राजकीय आरक्षण आदी कारणांमुळे राज्यातील २९ महापालिका, २४८ नगरपालिका, २६ जिल्हा परिषदांसह अन्य शेकडो स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका होऊ शकल्या नाहीत. सर्व कारभार प्रशासकांच्या हाती आहेत. पाच ते दोन वर्षांपासून निवडणुकाच न झाल्याने सर्व राजकीय पक्षांच्या कार्यकर्त्यांसह नागरिकही त्रासलेले आहेत.






महाविकास आघाडी सरकारने मुंबई वगळता अन्य महानगरपालिकांमध्ये तीन सदस्यीय प्रभाग पद्धत लागू केली होती. मुंबईची लोकसंख्या आणि प्रभागांचा आकार लक्षात घेता एक –सदस्यीय प्रभाग पद्धत कायम ठेवण्यात आली होती. विद्यमान सरकारने पुन्हा प्रभागांच्या संख्येत बदल केला आहे. महानगरपालिकांमध्ये चार सदस्यीय प्रभाग पद्धत लागू करण्यात आली असली तरी नगरपालिका आणि नगरपंचायतींमध्ये तीन सदस्यीय प्रभाग आणि नगराध्यक्षांची थेट निवड़णूक कायम राहणार आहे. कोरोना काळात उद्भवलेली आरोग्यविषयक परिस्थिती हाताळताना निदर्शनास आलेल्या बाबी तसेच लोकप्रतिनिधींनी सरकारसमोर मांडलेली वस्तुस्थिती पाहता महापालिका क्षेत्रातील समस्या, प्रश्नांचे निराकरण हे प्रभागात सामूहिक प्रतिनिधित्वामुळे म्हणजेच बहुसदस्यीय प्रभाग पद्धतीमुळे सुलभ होऊ शकते, याचा विचार करून चार समस्दीय प्रभाग पद्धती लागू करण्याचा निर्णय मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आल्याचे सांगण्यात आले.

राज्यात गेली २० वर्षे महापालिकांमधील प्रभाग रचनेचा खेळ सुरू आहे. सत्ताबदल झाल्यानंतर नवीन सरकार आपापल्या राजकीय सोयीने प्रभागांच्या संख्येत बदल करत आले आहे. २००१मध्ये विलासराव देशमुख सरकारच्या काळात बहुसदस्यीय प्रभाग पद्धत लागू करण्यात आली. तेव्हापासून दर पाच वर्षांनंतर प्रभागांच्या संख्येत बदल करण्यात येत आहे. तत्कालीन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सरकारने सन २०१७ मध्ये बहुसदस्यीय म्हणजेच चार सदस्यांची एक प्रभाग पद्धती लागू करण्यात आली होती. मात्र उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वाखालील महाविकास आघाडी सरकारने सन २०१९मध्ये फडणवीस सरकारचा निर्णय रद्द करीत पुन्हा एकदा एकसदस्यीय प्रभाग रचना लागू केली होती. त्यानंतर पुन्हा ठाकरे सरकारनेच सप्टेंबर २०२१ मध्ये तीन सदस्यीय प्रभाग रचनेचा निर्णय घेतला. करोनामुळे महापालिकांच्या निवडणुका लांबणीवर पडल्या. त्यानंतर न्यायप्रवीष्ट असल्याने महापालिका निवडणुकांना मुहूर्त मिळालेला नाही.

# १५ ऑगस्टला स्थानिक स्वराज्य संस्थेची निवडणूक लागेल

## महापालिका निवडणुकीच्या तारखांबाबत चंद्रशेखर बावनकुळे यांचे भाकीत

**नाशिक (प्रतिनिधी)–** आगामी महापालिका निवडणुकांच्या अनुषंगाने आता राजकीय पक्ष मैदानात उतरले असून पक्षाचे मेळावे, बैठका आणि कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करण्यात येत आहे. नाशिक येथे भाजपच्यावतीने मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. या मेळाव्यात बोलताना भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका १५ ऑगस्टला लागतील अशी तारीखच सांगितली.

तसेच केवळ नेत्यांच्या मागे फिरणाऱ्यांना महापालिका निवडणुकीत तिकीट मिळणार नाही, नेत्यांपुढे चमकोगिरी करू नका असे स्पष्ट शब्दात सांगितलं. त्यामुळे, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांकडे संधी म्हणून वाट पाहणाऱ्या भाजप कार्यकर्त्यांना आता आपलं तिकीट फिक्स करण्यासाठी मैदानात उतरुन काम करावे लागणार आहे.

नरेंद्र मोदींच्या कार्यकाळात भाजप सरकारने घेतलेले निर्णय आणि केलेल्या विकासाच्या कामांची माहिती देण्यासाठी भाजपच्यावीने कार्यशाळेचे



आयोजन करण्यात आलं आहे. भाजप पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी गेल्या ११ वर्षांत मोदी सरकारने केलेल्या कामांची उजळणी करुन ती कामे जनतेपर्यंत पोहोचवायची आहेत, त्यासाठी आयोजित कार्यक्रमात बोलताना भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी निवडणुकांची तारीखच जाहीर केली. ही कार्यशाळा मोदींच्या ११ वर्षांची कारकीर्द सांगण्याची आहे. आगामी निवडणुकीत एक-एक मत महत्वाचं आहे, कमळ चिन्हावर लढणाऱ्याला एकाही कार्यकर्त्याला निवडणूक हरू द्यायची नाही हा संकल्प आम्ही घेतला आहे. विधानसभा निवडणुकांपूर्वी लाडकी बहीण, शेतकरी वीज बिल माफ हे निर्णय आपल्या सरकारने घेतले होते. आता, १५ ऑगस्टला स्थानिक स्वराज संस्था निवडणूक लागेलंच, असे म्हणत चंद्रशेखर बावनकुळे यांनी नाशिकमधून महापालिका निवडणुकीची तारीखच सांगितली आहे. पहलगाम हल्ल्यानंतर पंतप्रधान नरेंद्र मोदींनी ऑपरेशन सिंदूर राबवत 'सिंदूर'चा बदला घेतला, तो दुसऱ्या सरकारनं घेतला नसता, असेही यावेळी बावनकुळेंनी म्हटलं.

नाशिक महापालिका निवडणुकांसाठी भाजप नेते आणि मंत्री गिरीश महाजन यांनी १०० प्लसचा नारा दिला आहे. महापालिका निवडणुकांसाठी युती झाली तर ठीक, नाहीतर स्वबळावर निवडणुका लढवण्याचा नारा महाजन यांनी पक्षाच्या मेळाव्यात दिला आहे. नाशिकमध्ये आयोजित भाजपाच्या उत्तर महाराष्ट्र विभागीय कार्यशाळेत गिरीश महाजन यांनी महायुतीसंदर्भात मोठं वक्तव्य केलं आहे. गटबाजी थांबून महापालिका निवडणुकांसाठी कामाला लागा अशा सूचनाही पदाधिकारी व कार्यकर्त्यांना करण्यात आल्या आहेत. विशेष म्हणजे येथील सूत्रसंचालकांकडून गिरीश महाजन यांचा संभाव्य पालकमंत्री म्हणून उल्लेख करण्यात आल्याने काहींच्या भुवया उंचावल्याचं पाहायला मिळालं.

# महाराष्ट्र समृद्धी महामार्गाच्या अंतिम टप्प्याचे लोकार्पण

## 'समृद्धी महामार्ग' वाढवण बंदराशी जोडणार –मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस



**नाशिक (प्रतिनिधी)–** हिंदु हृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे महाराष्ट्र समृद्धी महामार्ग राज्याच्या विकासात महत्वाची भूमिका बजावणार आहे. हा महामार्ग राज्याच्या समृद्धीचा कॉरिडॉर ठरणार आहे. येत्या काळात या महामार्गाला वाढवण बंदराशी जोडण्यात येईल, असे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले.

हिंदु हृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे महाराष्ट्र समृद्धी महामार्गाच्या अंतिम टप्प्याचे लोकार्पण व सायन पनवेल महामार्गावरील ठाणे खाडी पूल क्रमांक तीन दक्षिण वाहिनीचा लोकार्पण सोहळा दूरदृश्य संवाद प्रणालीद्वारे मुख्यमंत्री फडणवीस यांच्या हस्ते झाला. यावेळी ते बोलत होते. कार्यक्रमाला उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार, शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे, सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांच्यासह अन्य मंत्री उपस्थित होते.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, समृद्धी महामार्गासाठी विक्रमी वेळेत भूसंपादन करण्यात आले आहे. या मार्गामुळे विदर्भ, मराठवाडा आणि उत्तर महाराष्ट्रासह राज्यातील २४ जिल्हे जेएनपीटी बंदराशी जोडले गेले आहेत, आता हा महामार्ग वाढवण बंदराशी जोडला जाईल. ७०१ किलोमीटर लांबीच्या या महामार्गासाठी ५५ हजार ३३५ कोटी रुपयांचा खर्च झाला आहे. समृद्धी महामार्गासह पालखी मार्गावर वन विभागाच्या माध्यमातून वृक्षारोपण करण्याचा निर्णय घेतला आहे.

# राज्यातील ९०३ योजनांची मान्यता रद्द, सरकारचा निर्णय

**मुंबई (प्रतिनिधी)–** मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखालील महाराष्ट्र सरकारने निर्णय घेतला आहे. राज्यातील तब्बल ९०३ विकास योजनांची प्रशासकीय मान्यता रद्द करण्यात आली आहे. गेल्या काही वर्षांपासून रखडलेल्या आणि प्रत्यक्षात कोणतीही प्रगती न झालेल्या योजनांना यामध्ये समाविष्ट करण्यात आले आहे. मृद व जलसंधारण विभागाच्या माध्यमातून हा निर्णय जाहीर करण्यात आला आहे. यामध्ये लघुपाटबंधारे योजना, कोअर पाझर बंधारे, पाझर तलाव, साठवण तलाव दुरुस्ती योजना अशा अनेक योजनांचा समावेश आहे. या योजनांची अंमलबजावणी गेल्या तीन वर्षांपासून रखडली होती.

भूसंपादनासंदर्भातील अडचणी, स्थानिक नागरिकांचा विरोध आणि काही ठेकेदारांकडून मिळणारे असहकार्य यामुळे या योजना पूर्ण होऊ शकल्या नाहीत. त्यामुळे शासनाने या योजनांना अधिक वेळ देण्याऐवजी थेट त्यांची प्रशासकीय मान्यता रद्द करण्याचा निर्णय घेतला आहे. या निर्णयामुळे निधीचा गैरवापर टाळण्यास मदत होईल, तसेच नव्या योजनांसाठी मार्ग मोकळा होईल.

राज्यातील विकासासाठी सरकार प्रयत्नशील असले तरी अर्धवट राहिलेल्या योजनांमुळे निधी अडकतो आणि प्रत्यक्षात लाभार्थ्यांपर्यंत सेवा पोहोचत नाही. त्यामुळे अशा योजनांना हटवून कार्यक्षम योजना राबवण्याचा सरकारचा हा निर्णय महत्त्वपूर्ण मानला जात आहे. या निर्णयामुळे जिल्हा आणि तालुका स्तरावर काय परिणाम होतील, याकडे आता सगळ्यांचे लक्ष लागले आहे.

दरम्यान, राज्यातील बहुचर्चीत लाडकी बहीण योजनेमुळे राज्य सरकारच्या तिजोरीवर ताण येत असल्याची चर्चा आहे. दर महिन्याला हजारो कोटींचा निधी लाडकी बहीण योजनेसाठी राखीव आहे. त्यासाठी इतर विभागांचा निधी वळवल्यामुळे त्या त्या विभागांनी नाराजी वर्तवल्याची उदाहरणे गेल्या काही दिवसात समोर आली होती. त्यामुळे आता रखडलेल्या योजना रद्द करण्यामागे हे सुद्धा कारण आहे का ? हे पाहावं लागणार आहे.

# बंगळुरू चेंगराचेंगरी : बंगळुरूचे पोलीस आयुक्त, डीसीपी-एसीपी अन् हवालदारपर्यंत सगळेच निलंबित

**मुंबई (प्रतिनिधी)–** बंगळुरू चेंगराचेंगरीसंबंधी कर्नाटक राज्याचे मुख्यमंत्री सिद्धारमय्या यांनी निर्णय घेतला आहे. बंगळुरू शहराच्या पोलीस आयुक्तांना त्यांनी निलंबित केलं आहे. तसेच अतिरिक्त पोलीस आयुक्त, एसीपी, डीसीपी यांच्यासह स्थानिक पोलीस स्थानकाच्या पोलीस निरीक्षकांनाही निलंबित केलं आहे. त्याचसोबत आरसीबी संघ आणि इव्हेंट मॅनेजमेंट कंपनीविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूने १८ वर्षांनंतर आयपीएल जिंकल्यानंतर बंगळुरूतील चिन्नास्वामी स्टेडिअमवर एका कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या स्टेडिअमच्या बाहेर मोठी गर्दी झाल्यानंतर चेंगराचेंगरीची घटना घडली. त्यामध्ये ११ जणांचा बळी गेला तर ५० हून अधिक लोक जखमी झाले. यानंतर आता कर्नाटकच्या मुख्यमंत्र्यांनी कडक कारवाई केली आहे.

बंगळुरू चेंगराचेंगरीच्या घटनेची चौकशी करण्यासाठी कर्नाटक उच्च न्यायालयाचे निवृत्त न्यायाधीश मायकल डी. कुन्हा यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती नेमण्यात आली आहे. या समितीला ३० दिवसांच्या आत आपला अहवाल देण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

# नरेगा मस्टरसाठी डॅशबोर्ड विकसित; प्रत्येक आठवड्याला जिल्हास्तरावर आढावा

**नांदेड (प्रतिनिधी)–** महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत (नरेगा) ग्रामपंचायत स्तरावर काम उपलब्ध करून दिले जाते. सध्या जिल्ह्यात मोठ्या प्रमाणावर घरकुलांची कामे सुरू असून या कामांतर्गत लाभार्थ्यांना ९० दिवसांची मंजुरी नरेगा योजनेतून दिली जाते. मात्र काही ठिकाणी मस्टर वेळेवर निघत नसल्यामुळे लाभार्थ्यांना मजुरी मिळण्यात अडचणी येत होत्या.

या पार्श्वभूमीवर नरेगा आयुक्तांनी मस्टर व्यवस्थापनासाठी एक सुसंगत डॅशबोर्ड प्रणाली विकसित केली आहे. या डॅशबोर्डचा आढावा जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मेघना कावली यांनी घेतला. डॅशबोर्डच्या माध्यमातून सर्व पंचायत समित्यांमधील नरेगाच्या कामांचे मस्टर भरले गेले आहेत की नाही, याची माहिती सुलभपणे मिळणार आहे.

या नव्या प्रणालीच्या मदतीने प्रत्येक आठवड्याला जिल्हास्तरावर मस्टर प्रक्रियेचा आढावा घेण्यात येणार आहे. ज्या ठिकाणी मस्टर तयार करणे बाकी आहे, तेथे तात्काळ पावले उचलण्यात येणार आहेत.

या अनुषंगाने दि. ४ जून रोजी जिल्हा परिषदेच्या कॉन्फरन्स हॉलमध्ये आढावा बैठक पार पडली. यावेळी सीईओ मेघना कावली यांनी डॅशबोर्डच्या कार्यपद्धतीची सविस्तर माहिती दिली. बैठकीस अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी संदीप माळोदे, सामान्य प्रशासन विभागाचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी राजकुमार मुक्कावार, नरेगा विभागाचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी अमित राठोड, जल जीवन मिशनचे प्रकल्प संचालक नारायण मिसाळ तसेच जिल्ह्यातील सर्व गटविकास अधिकारी उपस्थित होते.

# आंतरराष्ट्रीय लेव्हल क्रॉसिंग जागरूकता दिनानिमित्त नुक्कड नाटकाचे सादरीकरण

**नांदेड (प्रतिनिधी)–** आंतरराष्ट्रीय लेव्हल क्रॉसिंग जागरूकता दिन (आयएलसीएडी) निमित्त गुरुवारी पूर्णा- अकोला रेल्वे विभागातील लेव्हल क्रॉसिंग गेट क्रमांक १५५ येथे नुक्कड नाटक (पथनाट्य) सादरीकरण करण्यात आले.

या कार्यक्रमाचा उद्देश रस्ते वापरकर्ते आणि सामान्य जनतेमध्ये लेव्हल क्रॉसिंगवरील सुरक्षिततेच्या महत्त्वाबद्दल जागरूकता निर्माण करणे हा होता. आकर्षक सादरीकरणाद्वारे, नुक्कड नाटकाने लेव्हल क्रॉसिंगवरील निष्काळजीपणाचे धोके अधोरेखित केले




आणि अपघात टाळण्यासाठी वाहतूक नियमांचे काटेकोरपणे पालन करण्याची गरज अधोरेखित केली.

हा उपक्रम सार्वजनिक सुरक्षितता आणि सामुदायिक संपर्कासाठी भारतीय रेल्वेची सतत वचनबद्धता दर्शवितो, रेल्वे क्रॉसिंगवर सुरक्षित संवादांना प्रोत्साहन देतो.

# शहरातील आठ सराईत गुन्हेगार सहा महिन्यांसाठी जिल्ह्यातून हद्दपार



**नवीन नांदेड (प्रतिनिधी)–** नांदेड शहर, सिडको, हडको, विष्णुपुरी आदी परिसरात सतत गुन्हेगारी करून दहशतीचे वातावरण पसरविणाऱ्या अट्टल आठ सराईत गुन्हेगारांना सहा महिन्यांसाठी जिल्ह्यातून हद्दपार करण्यात आले आहेत. सदरची कारवाई पोलीस निरीक्षक ओमकांत चिंचोलकर यांच्या अहवालावरून पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार आणि जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी केली.

पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार यांनी नांदेड शहरात तसेच जिल्ह्यामध्ये शांतता व सुव्यवस्था अबाधीत राखण्यासाठी नांदेड जिल्ह्यातील गुन्हे अभिलेखावरील सक्रीय तसेच वारंवार गुन्हे करणारे सराईत आरोपीविरुध्द प्रतिबंधात्मक उपाय योजना करण्या संबंधाने सर्व पोलीस ठाणे प्रभारी अधिकारी यांना सुचना दिलेल्या आहेत. जिल्ह्यातील कारवाई वारंवार प्रतिबंधात्मक कार्यवाही करुन देखील त्यांचे वर्तनात सुधारणा होत नसल्याने नांदेड जिल्ह्यातील सर्व पोलीस ठाणेदारांकडून सराईत गुन्हेगारांना हद्दपार तसेच स्थानबद्ध करणे संबंधाने कारवाई सुरू आहे.

नांदेड जिल्हयामध्ये शांतता व सुव्यवस्था अबाधीत राखण्यासाठी एमपीडीएअंतर्गत सन २०२४ मध्ये एकुण १३ रेकॉर्डवरील सराईत गुन्हेगारांना कारागृहामध्ये स्थानबध्द करण्यात आले असून सन २०२५ चालू वर्षामध्ये १० सराईत गुन्हेगारांस कारागृहामध्ये स्थानबध्द करण्यात आले आहे. त्याचबरोबर पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार यांनी सन २०२४ ते २०२५ महाराष्ट्र पोलीस अधिनियम कलम ५५ प्रमाणे एकूण ८७ गुन्हेगारांना हद्दपार केले आहे. तसेच सन २०२५ मध्ये महाराष्ट्र पोलीस अधिनियम कलम ५६ प्रमाणे एकुण ११ गुन्हेगारांना हद्दपार करण्यात आले आहे.

नांदेड ग्रामीण ठाण्याचे पोलीस निरीक्षक ओमकांत चिंचोलकर यांनी सराईत गुन्हेगार यांच्यावर गंभीर दुखापत, अवैध शस्त्र बाळगणे अशा दाखल असलेल्या गुन्ह्याची माहिती एकत्रित केली. त्यांच्यावर वेळोवेळी प्रतिबंधात्मक कारवाई करुन त्यांच्या वर्तणुकीत सुधारणा होत नसल्याचे दिसून आल्याने, त्यांच्याविरुध्द कायदेशीर कागदपत्रांची जुळवणूक करण्यात आली. त्यानंतर ऋत्विक गोपाळ पदमवार (वय २२ वर्ष, रा. विष्णुपुरी), आकाश ऊर्फ टमाट्या आनंदराव कदम (वय २१ वर्ष रा. राहुलनगर वाघाळा), दिलीप पुंडलीकराव डाकोरे (वय २७ वर्ष रा. रविनगर, कौठा), ज्ञानेश्वर नरहरी पुंडवय (वय ३४ वर्ष रा. कौठा) व इतर ४ जणांना हद्दपार करण्यात आले. त्यांच्याविरुध्द महाराष्ट्र पोलीस अधिनियम कलम ५६ (१) (ब) प्रमाणे वरिष्ठ अधिकारी यांच्याकडे एकूण ३४ प्रस्ताव पाठवून त्याचा पाठपुरावा करुन उपविभागीय दंडाधिकारी, नांदेड यांच्याकडून हद्दपार प्रस्ताव मंजुर करुन वरील ८ इसमांना नांदेड जिल्ह्यातून सहा महिन्यांकरिता हद्दपार करण्यात आले आहे.

# माहूर तालुक्यातील पडसा रेती घाटावर मोठी कारवाई

## अवैध रेती उपसा करणारे २ क्रेन, १ जेसीबी, हायवा जप्त

**किनवट (प्रतिनिधी)–** येथील सहायक जिल्हाधिकारी झेनिथ चंद्र दोन्थुला व महसूल विभागाच्या पथकाने बुधवार, दि. ४ जुनच्या रात्री धाडसी कारवाई करीत माहूर तालुक्यातील पडसा येथील पैनगंगा नदीपात्रातून २ क्रेन, १ जेसीबी व १ हायवा ताब्यात घेतला आहे. या कारवाईत अद्याप कुणावरही गुन्हा दाखल करण्यात आला नाही.

पैनगंगा नदीचे पात्र विदर्भातील यवतमाळ जिल्ह्याच्या अलीकडून माहूर तालुक्यात वळसा घालून आहेत. या दोन्ही बाजूला वाळू तस्करांचे मोठे रॅकेट असून विदर्भाच्या राणीधानोरा, कौठा बाजार, तर माहूर तालुक्यात पडसा, नेर, टाकळी, वडसा या घाटांवर वाळू तस्करांनी हैदोस घातला आहे. रात्र-दिवस बेसुमार अवैध वाळू उपसा सुरू आहे. याविरूद्ध महसूल विभागाने अनेकवेळा कारवाई करूनही ही अवैध वाळू तस्करी थांबली नाही. दरम्यान, बुधवारी



रात्री १० वाजेच्यादरम्यान येथील सहायक जिल्हाधिकारी झेनित चंद्र दोन्थुला यांनी स्वतः गुप्त माहितीच्या आधारावर नायब तहसीलदार रामेश्वर मुंडे, तलाठी रामदास शेडगे, तायडे, दीपक पाडोळे व पोलीस कर्मचारी वानखेडे, अनंतवार यांना सोबत घेत पथकाने पडसा नदीपात्र गाठले. नदीपात्रातून अवैधरित्या वाळू उपसा व वाहतूक करणारे २ क्रेन, १ जेसीबी व १ हायवा ताब्यात घेतला. ही कारवाई ५ गुरुवारी पहाटे ४ वाजेपर्यंत सुरू होती. जप्त केलेली वाहने माहूर तहसीलदारांच्या ताब्यात देण्यात आली.

जे जे आपणासी ठावे, ते ते इतरांसी सांगावे
शहाणे करूनी सोडावे, सकळ जन
संस्थापक संपादकः
कै. देविदासराव रसाळ
गोदातीर समाचार
संपादक
केशव घोणसे पाटील

# नियोजनाचा अभाव आणि अमूल्य बळी

आरसीबीच्या (रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू) १८ वर्षांनंतरच्या आयपीएल विजयाचे स्वागत करणाऱ्या परेडमध्ये घडलेली चेंगरा-चेंगरी ही केवळ एक शोकांतिका नसून, ती नियोजनशून्यतेचा आणि व्यवस्थेच्या अपयशाचा जिवंत दाखला आहे. या घटनेत ११ निष्पाप नागरिकांचा मृत्यू झाला आणि ४७ जण जखमी झाले. या हकनाक मृत्यूंमागे केवळ अतिउत्साह नाही, तर त्याहून गंभीर-आयोजक, प्रशासन आणि पोलीस यंत्रणेतील समन्वयाचा अभाव आहे. आयपीएलमधील आरसीबीचा बहुप्रतिक्षित विजय हा बंगळुरूकर आणि कर्नाटकवासीयांसाठी अत्यंत भावनिक आणि ऐतिहासिक क्षण होता. १८ वर्षांच्या प्रतीक्षेनंतर जिंकलेले हे विजेतेपद त्यांच्या आनंदोत्सवाचे कारण ठरले. विधान सौधापासून चिन्नास्वामी स्टेडियमपर्यंत नियोजित परेड ही त्या जल्लोषाचे केंद्रबिंदू होती. परंतु उत्सवाचे रूपांतर मृत्यूमोहिमेत होईल, हे कोणाच्या गावीही नव्हते. या घटनेमागे अनेक त्रुटी ठळकपणे दिसून येतात. मैदानाची क्षमता जेमतेम ३५ हजार असताना, अंदाजे तीन लाख लोक परिसरात एकवटले. मैदानात प्रवेशासाठी फ्री पासेस देण्यात आल्या, पण त्याबाबत पुरेशी आणि स्पष्ट माहिती जनतेला मिळालीच नाही. परिणामी, हजारो लोक तिकिटाशिवाय मैदानाच्या दिशेने निघाले. पोलिसांनी नियंत्रित गर्दीची व्यवस्था केली नाही, ना कोणताही आपत्ती निवारण यंत्रणा सज्ज होती. गेट नंबर १ उघडताच गर्दी धावत तिकडे गेली. कोणीही व्यवस्था सांभाळायला नव्हतं. मैदानाच्या दिशेने चाललेल्या या अनियंत्रित लाटे-मध्ये अनेकजण चिरडले गेले. केवळ सेलिब्रिटी दर्शनाची ओढ आणि उत्सवात सामील होण्याची उत्कंठा या साऱ्यांची किंमत ११ बळींनी मोजावी लागली. या घटनांतील नियोजनात अनेक त्रुटी आढळून आल्या आहेत. जसे मैदानाची क्षमता ठाऊक असूनही, फ्री पासेस वितरणाबाबत स्पष्टता नव्हती. कोणतीही आपत्ती व्यवस्थापन योजना समोर नव्हती. पोलीस, आयोजक व स्थानिक प्रशासन यांच्यात समन्वय नव्हता. नियंत्रित प्रवेशद्वारे, झोनिंग किंवा मेट्रो सेवा नियंत्रित पद्धतीने चालवण्याचे नियोजन केले गेले नाही. याचाच अर्थ ह्या मृत्यूचे महत्त्वाचे कारण म्हणजे व्यवस्थापनाचा ढिसाळपणा. त्यांच्यावर सदोष मनुष्यवादाची कार्यवाही केली जाणे गरजेचे आहे. अशा प्रकारची घटना भविष्यात होऊ नये यासाठी काही मार्गदर्शक तत्त्वे लागू करणे गरजेचे झाले आहे. गर्दी नियोजनाचे शास्त्रीय पद्धतीने करणे अत्यावश्यक आहे. प्रत्येक सार्वजनिक कार्यक्रमा-साठी आपत्ती प्रतिबंधक योजना बंधनकारक असावी. इव्हेंट मॅनेजमेंटसाठी तज्ज्ञांची नेमणूक केली जावी. भावनिक आणि जनमानसाला भिडणाऱ्या घटना अधिक जबाबदारीने हाताळल्या पाहिजेत. डिजिटल पास प्रणाली वापरून, गर्दीचे पूर्वानुमान आणि प्रवेश मर्यादा ठरवता येतील. पोलिसांची आणि वैद्यकीय यंत्रणेची तैनाती प्रत्येक महत्त्वाच्या पॉईंटवर असावी. मुख्यमंत्री सिद्धरामय्या यांनी या घटनेबाबत चौकशी आणि मृतांच्या कुटुंबियांना आर्थिक मदतीची घोषणा केली आहे, हे स्वागतार्ह आहे. परंतु ही फक्त घटना नोंदवण्याची बाब न राहता, या घटनेतून शिकलं गेलं पाहिजे. केवळ अनपेक्षित असे म्हणून जबाबदारी झटकण्याऐवजी दोषी अधिकाऱ्यांवर कारवाई केली जावी. ही बाब केवळ प्रस्तुत विजयाचाच नव्हे, तर आपल्या व्यवस्थेतील प्राथमिक गैरसमज व गोंधळ यांचं प्रतिबिंब आहे. या घटनेने अनेक प्रश्न उभे केले आहेत. जसे जनतेसाठी उत्सव साजरे करताना कायदा, नियम आणि सुरक्षा झोपली होती का? अशा कार्यक्रमांची जवाबदारी कोणावर असते? उत्सवाच्या आनंदात कोणाची किंमत जीव असावी का? विजय ऐतिहासिक ठरला, पण त्याची आठवण आनंदाची न राहता शोकांतिका बनली. अशा घटना पुन्हा घडू नयेत, यासाठी नियोजन, जबाबदारी आणि मानवी संवेदना यांचा समतोल राखणे ही वेळेची गरज आहे.

# हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे महाराष्ट्र समृद्धी महामार्ग; महाराष्ट्राची भाग्यरेषा



राज्याची प्रगती अधिक गतीमान करण्यात दळणवळण सुविधांची व्यापक उभारणी महत्वाची बाब आहे. त्याला प्राधान्य देत शासन नागरिकांच्या प्रवास सुविधेच्या दृष्टीने अनेक प्रकल्प गतीने पूर्ण करत आहे.यामध्ये सर्वात महत्वाचा ठरलेला ७०१ कि.मी लांबीचा हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे महाराष्ट्र समृद्धी महामार्ग आता अंतिम टप्प्यासह पूर्णपण सुरु होत आहे.

विदर्भ, मराठवाडा आणि उत्तर महाराष्ट्रासह राज्यातील २४ जिल्ह्यांना कलाटणी देणाऱ्या हिंदू हृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे महाराष्ट्र समृद्धी महामार्गाच्या नागपूर ते शिर्डी या ५२० किलोमीटर लांबीच्या पहिल्या टप्प्याचे लोकार्पण प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते दि. ११ डिसेंबर २०२२ रोजी पार पडले. दुसऱ्या टप्प्याचे अहिल्यानगर जिल्ह्यातील शिर्डी (कोकमठाण) ते नाशिक जिल्ह्यातील भरवीर इंटरचेंज दरम्यान एकुण ८० कि.मी लांबीचे लोकार्पण दि. २६ मे २०२३ रोजी तत्कालीन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते करण्यात आले तर समृद्धी महामार्गाच्या भरवीर इंटरचेंज ते इगतपुरी पर्यंतच्या २५ किमीच्या तिसऱ्या टप्प्याचे लोकार्पण दि. ४ मार्च २०२४ रोजी तत्कालीन सार्वजनिक बांधकाम मंत्री (सार्वजनिक उपक्रम) दादाजी भुसे यांच्या हस्ते झाले होते. एकूण ७०१ कि.मी पैकी ६२५ कि.मी लांबीचा हा महामार्ग सध्या वाहतुकीस सुरु असून आतापर्यंत जवळजवळ २ कोटी वाहनधारकांनी समृद्धी महामार्गाचा वापर केला आहे. आता, समृद्धी महामार्गाची उर्वरित ७६ कि. मी लांबीचे (इगतपुरी ते आमणे) लोकार्पण दि. ०५ जून २०२५ रोजी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे हस्ते आहे.

प्रकल्पाची व्याप्ती*

राज्याच्या पाच महसुल विभागाच्या १० जिल्ह्यातील २६ तालुक्यांमधील ३९२ गावांमधुन जाणारा हा सहा पदरी महामार्ग ग्रीन फिल्ड सरेखन आहे. समृद्धी महामार्गामुळे नागपूर, वर्धा, अमरावती, वाशीम, बुलढाणा, जालना, छत्रपती संभाजीनगर, अहिल्यानगर, नाशिक व ठाणे हे १० जिल्हे प्रत्यक्षरीत्या जोडले जातात. तसेच समृद्धी महामार्गामुळे चंद्रपूर, गोंदिया, भंडारा, गडचिरोली, यवतमाळ, अकोला, हिंगोली, परभणी, नांदेड, बीड, धुळे, जळगाव, पालघर व रायगड हे १४ जिल्हे अप्रत्यक्षरीत्या जोडले जातात. जुन्या नागपूर मुंबई मार्गावरुन नागपूरहून मुंबईकडे येण्यास १७-१८ तास लागतात. नवीन ग्रीनफिल्ड एक्सप्रेसवे ने प्रवास ८ तासात करणे शक्य होणार आहे. आता मुंबईतील जवाहरलाल नेहरु पोर्ट ट्रस्ट ते नागपूरस्थित मिहान यांना जोडणाऱ्या या महामार्गामुळे बंदरावरुन जलद वाहतुक करुन आवश्यक माल भारतभर वेळेवर पोहचवणे शक्य होणार आहे. हा प्रकल्प देशांतर्गत आणि आंतरराष्ट्रीय पातळीवर गुंतवणुकीच्या आधारे राज्यातल्या ग्रामीण भागास महत्वाचा ठरलेला आहे.

हा महामार्ग दिल्ली- मुंबई द्रुतगती मार्ग, जवाहरलाल नेहरु पोर्ट ट्रस्ट आणि शिर्डी, अजिंठा - वेरुळ लेणी, लोणार सरोवर आणि इतर पर्यटन स्थळांना जोडणारा आहे. देशाचे ग्रोथ इंजिन असणाऱ्या महाराष्ट्रासाठी हिंदु हृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे महाराष्ट्र समृद्धी महामार्ग ही खऱ्या अर्थाने समृद्धीची भाग्यरेषा ठरणार आहे.

वैशिष्ट्यांनी समृद्ध महामार्ग*

राज्य शासनाचा महत्वाकांक्षी प्रकल्प असेलला समृद्धी महामार्ग हा अभियांत्रिकी कौशल्यासह अनेक वैशिष्ट्यानींही समृद्ध असा महामार्ग आहे. दळणवळणाची गतीमान घौडदौड साध्य करत पर्यटन, उद्योग, शेतमालाला कमी वेळेत बाजारपेठेत पोहचवण्यास सहाय्यक ठरत असलेल्या समृद्धी महामार्गावरुन आता पर्यंत अंदाजे दोन कोटी वाहनांनी प्रवास करत सुखद, रहदारीमुक्त सुलभ, गतीमान प्रवासाचा अनुभव घेतला आहे.

सर्वाधिक लांबी रुंदीचा बोगदा*

समृद्धी महामार्गाच्या उर्वरित टप्प्यातील ७६ कि.मी ची लांबी ही नाशिक व ठाणे या दोन जिल्ह्यात येते. सह्याद्रीच्या पर्वतरांगामधून खडतर मार्ग काढत महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाने अभियांत्रिकी आव्हान पेलले. या टप्प्यामध्ये एकूण ५ दुहेरी बोगदे असून या बोगद्यांची लांबी १०.७३ कि.मी (दोन्ही मार्गिका मिळून एकूण लांबी २१.४६ कि.मी) आहे. त्यातील पॅकेज १४ (इगतपुरी) येथील बोगदा ८.०० कि.मी लांबीचा असून हा महाराष्ट्रातील सर्वाधिक लांबी व रुंदीचा (१७.६१ मीटर) बोगदा आहे. या बोगद्याची उंची ९.१२ मीटर आहे.

प्रथमच बोगद्यात वापरण्यात येणारी अग्निशमन यंत्रणा*

अग्निसुरक्षेसाठी भारतातील कोणत्याही बोगद्यात प्रथमच वापरण्यात येणारी अग्निशमन यंत्रणा इगतपुरीमधील सर्वात लांबीच्या बोगद्यामध्ये बसविण्यात आलेली आहे. या बोगद्यामुळे अंदाजे आठ मिनिटात इगतपुरी ते कसारा हे अंतर पार करता येणार आहे. त्यातुन राष्ट्रीय महामार्ग क्र. ३ नाशिक महामार्गावरील कसारा घाटाला पर्यायी मार्ग उपलब्ध झाला आहे. त्यामुळे वाहतुक अधिक जलद होणार आहे, कसारा घाटातील वाहतूक अधिक गतीमान होण्यासही त्यामुळे सहाय्य होणार आहे.

सर्वाधिक लांबीचा पूल*

भौगालिक परिस्थितीतून मार्ग काढत महामार्गाचे काम पुढे नेत असताना नाशिक व ठाणे या जिल्ह्यातील ७६ किमीच्या डोंगर दऱ्यामुळे व्हायाडक्ट (मोठे पूल) व बोगदे बांधणे हे मोठे जिकरीचे होते. काही ठिकाणी कठीण खडकात ३० ते ४० मीटरपर्यंत खोदकाम करावे लागले. या टप्प्यात एकूण १७ व्हायाडक्ट (मोठे व्हॅली पूल) असून त्याची एकूण लांबी १०.५६ कि.मी (दोन्ही मार्गिका मिळून एकूण लांबी २१.१२ कि.मी) आहे. या टप्प्यात सर्वाधिक लांबीचा पूल (व्हायाडक्ट) २.२८ कि.मी लांबीचा आहे. या टप्प्यात एका ठिकाणी (व्हायाडक्ट-२) पुलाच्या काही खाबांची उंची ८४ मीटरपर्यत आहे.

इंटरचेंजस

या टप्प्यात इगतपुरी, खुटघर व आमणे येथे इंटरचेंज येतात. या शेवटच्या टप्पात मोठ्या प्रमाणात विद्युत उच्च तसेच कमी दाबाच्या विद्युत वाहिन्या स्थलातरित कराव्या लागल्या, त्यामध्ये महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्यादितच्या कमी दाबाच्या ६२ वाहिन्या स्थलातरित करण्यात आलेल्या आहेत, तसेच, टोरेंट पॉवरच्या ५ विद्युत वाहिन्या व पॉवर ग्रीडची १ विद्युत वाहिनी स्थलांतरित करण्यात आलेली आहे. तसेच, या टप्प्यात १ रेल्वे ओलांडणी पुल बांधण्यात आलेला आहे.

पर्यावरण पूरक

प्रकल्पामध्ये वन्यजिव संरक्षणासाठी एकुण १०० बांधकामे पूर्ण झाली असून, त्यांची रचना वन विभागाच्या मार्गदर्शनाखाली तयार करण्यात आली आहे. वन्यजीवांच्या वावरासाठी महत्त्वपूर्ण असलेल्या ठिकाणी 'ध्वनी रोधक' ची तरतूद करण्यात आली आहे. समृद्धी महामार्गाच्या दुतर्फा ११ लक्ष ३१ हजार झाडे लावण्याची प्रक्रिया सुरु आहे. तसेच या प्रकल्पामध्ये एकूण २०३ मेगा व्हॅट सौर उर्जा निर्मिती प्रस्तावित आहे.

प्रवासातील सुलभता

इगतपुरी ते आमणे (ता. भिवंडी) हा ७६ किमीचा टप्पा वाहतुकीस सुरु झाल्यानंतर ठाणे (आमणे) व नागपूर पर्यंतचा प्रवास आठ तासात करणे सहजतेने शक्य होणार आहे. तसेच ठाणे, मुंबई परिसरातून शिर्डी येथे जाणाऱ्या भाविकांना ही या महामार्गामुळे आपला प्रवास सुलभरित्या व जलदपणे करणे शक्य होणार आहे. त्यासोबतच शिर्डी, अहिल्यानगर व नाशिक जिल्हयातील सिन्नर व इगतपुरी परिसरातील शेतकऱ्यांना आपला शेतमाल सुलभतेने कमी कालावधीत मोठ्या बाजारपेठांपर्यंत पोहचवता येणार आहे. शेतक-यांना, उद्योजकांना,प्रवाश्यांना मुंबई महानगर प्रदेशात कामानिमित्त वरचवेर येणे जाणे हे अधिक सोयीस्कर होणार असून शैक्षणिक,सांस्कृतिक,आरोग्यविषयक संधीचे क्षेत्र विस्तारण्याच्या दृष्टीने ही हा महामार्ग निश्चितचं प्रत्यक्ष-अप्रत्यक्षरित्या सहाय्यक ठरणारा आहे.

राज्याच्या उप राजधानीला राज्याच्या राजधानीपर्यंत जोडणार नागपूर ते मुंबई दरम्यानचे अतंर अवघ्या आठ तासांवर आणणारा समृद्धी महामार्ग निश्तिचं महाराष्टाच्या औद्यागिक, शैक्षणिक, सामाजिक, सांस्कृतिक विकासालाही गतीमान करणारा ठरेल, यात शंका नाही.

शब्दांकन,
**वंदना थोरात, वारेगावकर**
विभागीय संपर्क अधिकारी

# व्यसन सोडा, कॅन्सर टाळा, निरोगी राहा!



सहा महिन्यांपूर्वी एक हृदयद्रावक मोबाईल कॉल आला, 'मॅडम मी कंधारवरून बोलतेय.' एका २५ वर्षीय युवतीचा आवाज. मॅडम त्यांच्या तोंडाला कॅन्सरची गाठ आलीय. डॉक्टर म्हणतायेत, चौथ्या म्हणजे शेवटच्या स्टेजचा तोंडाचा कॅन्सर आहे. खूप पसरलाय. जेवण करता येत नाही. अन्नाची नळी टाकलीय, जखमेमधून रक्स्त्राव होतोय. मानेवर, पण नवीन जखमा येत आहेत. तोंडातली जखम वाढल्यामुळे हनुवटीच्याखाली जे छिद्र पडले आहे त्यातून सारखी लाळ बाहेर पडतेय. कपडा बांधलाय, पण काही उपयोग होत नाही. या तंबाखूने मला उद्ध्वस्त केले. अवघ्या अडीच वर्षाचा संसार, आठ महिन्यांचे बाळ. मागे टाटा हॉस्पीटल जाऊन आलोय. पण क्लिनिकल ट्रायलमध्ये बसवण्यासाठी ते फीट नाही म्हणतायेत. घरी घेऊन आलोय. पायाखालची जमीन सरकलीय. इम्युनोथेरपीसाठी लागणारा लाखोंचा खर्च खिशाला न परवडणारा आहे.

काही करा मॅडम, प्लिज...

दरवर्षी तेरा लाखांपेक्षा अधिक लोक या तंबाखू आणि तंबाखूजन्य पदार्थ बिडी, सिगारेड, हुक्का, जदा, सुपारी इत्यादीच्या व्यसनामुळे झालेल्या तोंड, घसा आणि मानेच्या कर्करोगामुळे दगावतात. दुर्देव असे की, आधुनिक उपचारप्रणाली किमोथेरपी, इम्युनोथेरपली, टर्गेटेडथेरपी असूनसुद्धा तोंडाच्या चौथ्या स्टेजच्या रुग्णाचे आयुष्य जास्त वाढवता येत नाही.

आपला भारत देश कृषीप्रधान. अनेक प्रकारची पिके, अन्नधान्याने व फळभाज्याने समृद्ध तरीपण खाण्यापिण्यासाठी आजकालची युवापिढी तंबाखू, बिड्यांनाच (मरणाला) का निवडते हे मात्र न उलगडणारे कोडे आहे. कदाचित त्यालाच स्वतःच्या पायावर मोठा दगड मारून घेणे म्हणतात.

आजकाल वाचनालयापेक्षा पानपट्यांवर, दारूच्या अड्ड्यांवर जास्त गर्दी दिसते. गावोगावी लहान मुले, कॉलेजमध्ये तरुण, तरुणी या नशेच्या आहारी गेलेले दिसतात. ज्या ज्या भिंतीवर थुंकू नये असे असते त्यावर पान खावून पिचकाऱ्या मारलेल्या दिसतात, आणि काही फिल्मस्टार देखील अशा जाहिरातींना प्रोत्साहन देताना दिसतात. या सर्व रस्ता चुकलेल्यांसाठी कामे 'No Tabaco Day' युवा पिढीने मरणाची Choice करू नये, म्हणून जागरूकता पसरविण्यासाठीचा जागतिक तंबाखूसेवन विरोधी दिवस पाळता जातो.

माझा तर ठाम विश्वास आहे की, प्रत्येकाच्या जीवनात उत्तम मार्गदर्शकाची नितांत गरज असते. मला तुमचा मार्गदर्शक बनण्याची संधी द्या, कारण उपचारापेक्षा प्रतिबंध करा. हा जीवन उद्ध्वस्त करणारा क्रुर धूर आहे. मनावर ताबा ठेवा, जग जिंकाल. आत्मविश्वास निर्माण करा, चांगल्या सवयीचे मित्र बनवा, क्षणिक आनंदाच्या चक्रव्यूहात स्वतःला अडकवून घेऊ नका, तुमच्या आनंद, दुःख या गोष्टींना सामोरे जाण्यासाठी तंबाखूजन्य पदार्थाचा आधार घेऊ नका. तोंडामधील न भरणाऱ्या जखमा, रक्तस्त्राव, आवाजातील बदल, मानेवरील गाठी, कोरडा खोकला, खोकल्यातून रक्त पडणे, वजन कमी होणे, भूक न लागणे आदी लक्षणांसाठी तज्ज्ञांचा सल्ला घ्या. जीवन ही एक खूप सुंदर, मौल्यवान अशी निसर्गाची देणगी आहे. जीवन जगताना स्वतःहून मरणाचा पर्याय निवडू नका, दूरदृष्टी ठेवा. व्यसन सोडा, निरोगी राहा, कॅन्सर टाळा.

**-डॉ. प्रीती डी. कदम**
कॅन्सर किमोयेथेरपी तज्ज्ञ,
नांदेड

# अश्रूंची झाली विराट फुले!




तब्बल दिड तपानंतर म्हणजेच १८ वर्षानंतर विराटच्या आरसीबी संघाने आयपीएल चषक पटकावला असून अंतिम सामन्यात त्यांनी पंजाब संघाला पटकनी दिली आहे. आरसीबी संघ पाठीराख्यांच्या नसानंसात उसळणार्या आरबीसींना (रेड ब्लड सेल्स) साक्षी ठेवत विराटने चषक जिंकला आणि संघ तसेच पाठीराख्यांना अश्रूपूर्ण अभिवादन केले. तर प्रितीचा पंजाब किंग्ज संघ कमनशिबी ठरला. पाठलाग करतांना आवश्यक असलेली धावगती आणि सामन्यावरची पकड दोन्ही बाबतीत प्रितीचा संघ ढेपाळला आणि त्यांना उपविजेतेपदावर समाधान मानावे लागले.

झाले काय तर दुसऱ्या एलीमिनेटर लढतीत मुंबई इंडियन्सला बुकलून काढत पंजाब किंग्जने फायनलला दणक्यात प्रवेश केला होता. विशेषतः कर्णधार श्रेयस अय्यरची कामगिरी लक्षवेधी होती आणि अशीच काहीशी खेळी त्याच्या कडून, त्याच्या संघाकडून अपेक्षित होती. मात्र अंतिम सामन्यात नंतर फलंदाजी करताना एकप्रकारे दडपण असते. त्यातही पाठलाग करताना धावगती जवळपास दहापर्यंत असल्याने एखाद्या फलंदाजाने मोठी खेळी करणे अपेक्षित होते. खरेतर इथेच पंजाब किंग्जची रणनिती फसल्या-मुळे त्यांचा घात झाला. तसेही आरसीबी संघाकडे नाव घेण्यासारखे घातक गोलंदाज कुठे होते? मात्र फायनलचे प्रेशर श्रेयसचा संघाला झेपले नाही.

आरसीबी संघाबाबत बोलायचे झाले तर त्यांनी प्रथम फलंदाजी करत एक आव्हानात्मक धावसंख्या नक्कीच उभारली. भलेही ते २०/३० आणखी करू शकले असते परंतु शेवटच्या १० चेंडूत त्यांनी फक्त २३ धावां करत तब्बल पाच गडी गमावले. महत्त्वाचे म्हणजे कोणत्याही फलंदाजाने अर्धशतक ठोकले नाही तरी पण आरसीबी संघाने चाळीशीच्या चार भागीदारी करत दोनशेच्या जवळ पोहोचले. पहिल्या सात फलंदाजांनी वैयक्तिक धावा न बघता संघासाठी दणदणीत, वेगवान खेळी करत पंजाब गोलंदाजांवर वर्चस्व गाजवले. विशेषतः अर्शदीप, जेमीसन आणि चहल या प्रमुख गोलंदाजांना अजिबात भीक न घालता मुक्तहस्ताने ठोकले.

गमतीशीर बाब म्हणजे पंजाब संघाचा आखूड टप्प्यावर (शॉर्ट बॉल) गोलंदाजीचा प्लॅन होता, जो आरसीबीने उधळून लावला तर अर्शदीप आणि जेमीसनला प्रत्येकी ३/३ बळी मिळाले ते फुल लेंथ बॉलवर. पंजाब किंग्जच्या गोलंदाजांनी पॉवर प्ले (५५ धावा, १ बळी) आणि फायनल ओव्हर (४५ धावा, ५ बळी) मध्ये चांगली कामगिरी केली परंतु मिडल ओव्हर मध्ये ते आरसीबी फलंदाजांवर अंकुश लावू शकले नाहीत. मिडल ओव्हरला आरसीबी संघाने ३ गड्यांच्या मोबदल्यात ९० धावा कुटल्या. अर्थातच १९१ धावांचे टार्गेट पंजाब संघासाठी घाम फोडणारे होते आणि झालेही तसेच.

सलामीवीर प्रियांश आणि प्रभसिमरनने साडेचार षटकांत ४३ धावांची सलामी जरूर दिली पण त्यात जिंकू किंवा मरू चा बाणा नव्हता. हॅपी गो लकी प्रमाणे खेळ सुरू होता. त्यातच सॉल्टने प्रियांशचा सिमारेषेवर अफलातून झेल घेत पंजाबचे मीठ अळणी करून टाकले. तर प्रभसिमरनच्या धडपडी खेळीला कुणाल पांड्याने विराम दिला. पंजाब किंग्ज कडे श्रेयस, जॉश इंग्लिश, नेहाल वढेरा, स्टॉयनिस आणि शशांक सिंग सारखी भक्कम फलंदाजी लाभली होती. तिथे गरज होती या सुंदर टवटवीत फुलांना एका माळेत ओवणार्या एका मजबूत धाग्याची आणि तो धागा होता कर्णधार श्रेयस अय्यरचा. मात्र तो धागा दोन चेंडूत तुटला आणि प्रितीच्या संघाची अवस्था इस दिल के टुकडे हजार हुए, कोई यहां गिरा कोई वहां गिरा सारखी झाली.

मागील सामन्यात मुंबई इंडियन्सच्या बोल्ट, बुमराह या क्षेपणास्त्रांना श्रेयसच्या एस ४०० या डिफेन्स सिस्टमने लीलया निष्प्रभ केले होते. मात्र या सामन्यात शिकारी खुद यहां शिकार झाला होता. तरीही जॉश इंग्लिशच्या जोशने सामन्यात रंगत बाकी होती. पण पंजाब किंग्ज साठी ये दुख काहे खतम नहीं होता अशी अवस्था होती. पांड्या लिविंगस्टोन युतीने जॉश इंग्लिशला बाद करत पंजाबची नशा उतरवली. तर अनुभवी भुवीने १७ व्या षटकात वढेरा, स्टॉयनिसचा फडशा पाडत पंजाबच्या आशा मावळून टाकल्या. यशदयालने ओमरजाई आल्या पावली परत जाईल याची दक्षता घेतली.

मात्र कहाणीत अजून ट्वीस्ट बाकी होते. प्रचंड आशावादी असलेल्या शशांकने शेवटच्या क्षणापर्यंत लढण्याचा ध्यास घेतला होता. शेवटच्या षटकांत २९ धावा हव्या होत्या मात्र हेझलवूडचे चक्रव्यूह तो भेदू शकला नाही. अवघ्या सहा धावांनी पंजाब पराभूत झाला. श्रेयस बाद होताच त्याच्या संघाचा टेम्पो हरवला, नाव पैलतीरावर नेण्यासाठी कुशल नावाडी उरला नव्हता, धावगती सोन्याच्या भावासारखी झपाट्याने वाढल्याने पंजाब किंग्जचा नाईलाज झाला होता. अखेर प्रितीच्या संघासाठी आयपीएल चषक पुन्हा एकदा दिल अपना और प्रित पराई ठरला.

विराट जिंकला याचा जेवढा आनंद झाला तेवढेच दुःख प्रितीचा संघ हरल्याचे आहे. पन्नाशी गाठलेली परंतु हार जीत तेवढ्याच ताकदीने पचवणारी प्रिती झिंटा क्रिकेटच्या बाबतीत संयमाचा महामेरू ठरली आहे. पंजाबच्या फलंदाजांनी ३९% डॉट बॉल खेळले आणि ११ अवांतर धावा दिल्या ज्या त्यांना विजयापासून दूर घेऊन गेल्या. आरसीबी फलंदाजांची तडाखेबाज फलंदाजी, अय्यरचे लवकर बाद होणे, पांड्या भुवीने मोक्याच्या वेळी बळी घेणे हे या सामन्याचे महत्त्वाचे क्षण ठरले. शेवटच्या षटकात आरसीबी संघ अजिंक्य होत असताना विराटच्या डोळ्यात अश्रूंनी गर्दी केली होती. एक कमकुवत संघ, चोकर्स आणि नेहमी सामना नव्हे तर हृदय जिंकणारा संघ म्हणून ओळखल्या गेलेल्या संघांशी विराट प्रामाणिक राहिला. याचं प्रामाणिकपणाचे फळ म्हणून यावर्षी त्याच्या अश्रूंची विराट फुले झाली. हारसीबी चे रूपांतर जीतसीबी त करण्यात किती खस्ता खाव्या लागल्या याची साक्ष विराटचे अश्रू देत होते.

**-डॉ. अनिल पावशेकर**
नागपूर
मो. ९८२२९३९२८७

## थोडक्यात...

### एकात्मिक फलोत्पादन विकास अभियानातर्गंत अर्ज करण्याचे आवाहन

**नांदेड (प्रतिनिधी)–** एकात्मिक फलोत्पादन विकास अभियान अंतर्गत सन २०२५-२६ अंतर्गत फळे, फुले, मसाला लागवड, अळिंबी उत्पादन प्रकल्प व जुन्या फळबागांचे पुनरूज्जीवन हा घटक राबविण्यात येत आहे. शेतकऱ्यांनी विदेशी फळे, फुले, मसाला लागवड व अळिंबी उत्पादन प्रकल्प उभारणे करणे तसेच आंबा, चिकू, संत्रा व मोसंबी, लिंबु, पेरु, आवळा या फळपिकांच्या बागा असलेल्या अधिकाधिक शेतकऱ्यांनी महाडीबीटी पोर्टल mahadbtmahait.gov.in फलोत्पादन या घटकाखाली अर्ज करावेत. योजनेच्या अधिक माहितीसाठी संबंधित नजीकच्या कृषि कार्यालयाशी संपर्क साधावा असे आवाहन जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी दत्तकुमार कळसाईत यांनी केले आहे.

### गटविकास अधिकारी शेखर देशमुख यांनी स्वीकारला पदभार

**मुदखेड (प्रतिनिधी)–** येथील कर्तव्यदक्ष पंचायत समितीचे गटविकास अधिकारी श्रीकांत बळदे यांची बदली देगलूर येथे झाली. त्यांच्या जागेवर शेखर देशमुख यांची नियुक्ती करण्यात आली आहे. त्यांनी नुकताच गटविकास अधिकारीपदाच सूत्रे स्विकारली आहेत.



शेखर देशमुख हे यापूर्वी देगलूर पंचायत समितीत गटविकास अधिकारी पदावर कार्यरत होते. ते रुजू होताच मुदखेड येथील पंचायत समिती कार्यालयात अधिकारी कर्मचारी यांच्यावतीने त्यांचा सत्कार करण्यात आला.

# शेतकऱ्यांनी हवामानाचा अंदाज घेऊनच शेती करावी -पंजाबराव डक

## निळा येथील शेतकरी मेळाव्याला प्रतिसाद




**लोहा (प्रतिनिधी)–** शेतकऱ्यांनो, तुम्ही अजिबात काळजी करू नका. हवामानाचा अंदाज घेऊनच शेती करा. तुमच्या कष्टाचे नुकसान होऊ देणार नाही, असा सल्ला हवामान अभ्यासक पंजाबराव डक यांनी केले.

लोहा तालुक्यातील शेतकऱ्यांना हवामानाची, पिक पाण्याची, पेरणीची माहिती मिळावी याकरिता निळा येथे दि. ३ जून रोजी शेतकरी मेळावा घेण्यात आला. त्यावेळी ते बोलत होते. कार्यक्रमाला माजी जि. प. अध्यक्ष प्र. आनंदराव गुंडीले, भाजपाचे लोहा उत्तर मंडळ अध्यक्ष तथा लोहा न. प. चे माजी उपनगराध्यक्ष शरद पाटील पवार, माजी जि. प. सदस्य प्र. रंगनाथ भुजबळ , माजी जिल्हा परिषद सदस्य बालाजी परदेशी, निळाचे सरपंच बालाजी गजले, उपसरपंच गजानन पाटील मोरे, शेतकरी संघटनेचे प्रदेश युवा अध्यक्ष लक्ष्मण मोरे, शेतकरी संघटनेचे जिल्हाध्यक्ष बाळासाहेब जाधव, भाजपाचे लोहा दक्षिण मंडळ अध्यक्ष तथा माजी जिल्हा परिषद सदस्य चंद्रसेन पाटील सुरनर, माजी पंचायत समिती सदस्य उत्तम चव्हाण, लोहा कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक केरबा केंद्रे, विजय केंद्रे, शेलगावचे सरपंच मारोतराव पाटील कदम, पांगरीचे माजी सरपंच सुदामराव पाटील बुद्रुक, निळाचे तंटामुक्तीचे अध्यक्ष बाबाराव पाटील मोरे, पोखरीचे सरपंच ज्ञानेश्वर पाटील ताटे, धानोराचे सरपंच खुशाल पाटील भुजबळ, पोखरीचे उपसरपंच फुलाजी पाटील ताटे, निळाचे चेअरमन बाबाराव पाटील मोरे, पोलिस पाटील सोपान पाटील मोरे, शालेय समितीचे अध्यक्ष संतोष पाटील मोरे यांच्यासह पंचक्रोशीतील नागरिक, शेतकरी, महिला भगिनींनी मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

पंजाबराव डक म्हणाले की, दि.३१ मे ते ६ जून पर्यंत शेतीचे कामे करुन घ्या. या कालावधीत पाऊस पडणार नाही. शेतकऱ्यांना शेतीचे कामे करायला आणखी दोन दिवस आहेत. दि. ६ व ७ जून रोजी नांदेड जिल्ह्यात पाऊस पडेल.

दि. ११, १२, १३ रोजी कोरड हवामान राहील. दि. १३, १४, १५, १६, १७ ,१८ या तारखांना मुसळधार पाऊस पडणार आहे. दि.१९ जून रोजी वातावरण निरभ्र राहील. दि. २६ जूनपासून पुन्हा पाऊस पडेल २०२५ ला खूप पाऊस पडणार आहे.२०२६ ला पाऊस कमी पडणार पण पिके चांगले येणार पुढे तुम्हाला २०२७ ते २०५० हवामान व पावसाचा अंदाज देतो. शेतकऱ्यांच्या कष्टाचे नुकसान होऊ देणार नाही. दि.१३ जून ते १८ जून भरपुर पाऊस पडेल. तुमच्या शेताचा वापसा होणार नाही. दि. २७ जून नंतर पेरणी होईल.

डक पुढे म्हणाले की, विजेपासून बचाव करा. तांब्याची वस्तू वापरु नका, झाडाखाली थांबू नका. विशेष लिंबाच्या किंवा आंब्याच्या झाडाखाली थांबू नका पाण्यात व पाण्याच्या ठिकाणी थांबू नका. रामफळाच्या झाडाला जास्त रामफळ लागले. गावरान आंब्याच्या झाडाला जास्त आंबे लागले. गावरान आंब्याची रसाळी जास्त खाल्ल्या. आचार जास्त खाल्ला. त्यावर्षी पाऊसकाळ कमी पडतो, जसे २०१८ ला झाले. २०१९ पासुन गावरान आंबे कमी येत आहेत. पाऊस जास्त पडत आहे. यावेळी माजी जि. प. अध्यक्ष प्र. आनंदराव गुंडीले, माजी उपनगराध्यक्ष शरद पाटील पवार, शेतकरी संघटनेचे युवा प्रदेशाध्यक्ष लक्ष्मण मोरे, शेतकरी संघटनेचे जिल्हाध्यक्ष बाळासाहेब जाधव यांचीही भाषणे झाली. कार्यक्रमांचे प्रास्ताविक माजी जिल्हा परिषद सदस्य प्र. रंगनाथ भुजबळ यांनी केले तर आभार उपसरपंच गजानन पाटील मोरे यांनी मानले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी उपसरपंच गजानन पाटील मोरे मित्रमंडळाने परिश्रम घेतले.

# स्वामी नरेंद्राचार्य महाराज यांचा दोसपल्ली येथे दर्शन सोहळा



**बाऱ्हाळी (प्रतिनिधी)–** अनंत विभूषित श्री स्वामी नरेंद्राचार्य महाराज यांचे दोस्तपल्ली बंगारपल्ली (जूक्कल) उपपीठ तेलंगणा येथे दि.७ व ८ जून २०२५ रोजी समस्या मार्गदर्शन व दर्शन सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे.

या कार्यक्रमाच्या अनुषंगाने संस्थानच्या वतीने देशासह राज्यात विविध उपक्रम राबविण्यात येत आहेत. आरोग्याच्या दृष्टीने मरणोत्तर देहदान चळवळ मोठ्या प्रमाणावर सूरु केली आहे. आजपर्यंत तब्बल ११५ भक्तांनी विविध ठिकाणी मरणोत्तर देहदान केले आहे. त्या सोबत नेत्रदान, त्वचा दान यासह अवयव दान होत आहेत. 'ब्लड ईन निड' अंतर्गत गरजू रूग्णांना रक्तदाते एका फोनवर हव्या त्या रक्तगटाचे रक्तदाते दवाखान्यात जावून रक्तदान करतात. ४ जाने.ते १९ जानेवारी २५ दरम्यान १ लाख ४७ हजार २५६ रक्त बाटल्या संकलीत करण्यात आल्या होत्या. राज्यातील सहा राष्ट्रीय महामार्गावर ५६ रूग्ण वाहिका दिवसरात्र मोफत कार्यरत आहेत. अपघातस्थळी वेळेवर जात असंख्य प्रवाशांचे प्राण वाचविण्याचे कार्य करीत आहेत. यासोबतच अर्थिक दूर्बल घटकांना मदत, महिला समिक्षिकरण, पर्यावरण संवर्धन, ग्रामस्वच्छता, अंधश्रद्धा निर्मूलन, व्यसनमुक्ती यासह अनेक उपक्रम राबविले जात आहेत. याचाच एक भाग म्हणून दोस्तपल्ली बंगारपल्ली मं.जूक्कल जि.कामारेड्डी उपपीठ तेलंगणा येथे समस्या मार्गदर्शन व दर्शन सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. नांदेड जिल्ह्यातील भक्तांनी याचा लाभ घ्यावा, असे आवाहन नांदेड जिल्हा निरीक्षक बालाजी कोठारे, जिल्हा अध्यक्ष शाम नागलगावे यांच्यासह जिल्हा स्वरुप संप्रदायाच्या वतीने करण्यात आले आहे.

## मराठा-कुणबी विद्यार्थ्यांना परदेशात उच्च शिक्षणाची संधी

**नांदेड (प्रतिनिधी) –** मराठा, कुणबी, कुणबी-मराठा, मराठा-कुणबी या जातीतील गुणवंत विद्यार्थ्यांना परदेशातील नामांकित विद्यापीठामध्ये उच्च शिक्षण घेण्यासाठी आर्थिक मदत पुरवणारी महाराजा सयाजीराव गायकवाड सारथी गुणवंत मुला-मुलींना परदेशात उच्च शिक्षणासाठी शिष्यवृत्ती योजना राबविण्यात येत आहे. इच्छूक विद्यार्थ्यांनी सारथीच्या fs.maharashtra.gov.in या अधिकृत संकेतस्थळावर विहित नमुन्यात ऑनलाईन अर्ज १६ जून २०२५ पर्यत सादर करावा असे आवाहन छत्रपती संभाजीनगरचे सारथीचे उपव्यवस्थापकीय संचालक यांनी केले आहे.

शैक्षणिक वर्ष २०२३-२४ पासून प्रभावीपणे राबविली जात आहे. या योजनेच्या माध्यमातून दरवर्षी ७५ विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती प्रदान केली जाते. ही योजना मराठा-कुणबी समाजातील गुणवंत विद्यार्थ्यांना जागतिक स्तरावर शिक्षण घेण्यासाठी प्रोत्साहन देणारी ठरणार आहे.

# राज्य कर्मचाऱ्यांना वाढीव महागाई भत्याचा लाभ रोखीने द्यावा

## किनवट- माहूर तालुका समन्वय समितीची मुख्यमंत्र्यांकडे मागणी

**किनवट (प्रतिनिधी) –** केंद्र शासनाच्या धर्तीवर राज्य शासनानेही राज्य सरकारी कर्मचाऱ्यांना १ जानेवारी २०२५ पासून २ टक्के वाढीव महागाई भत्ता मंजूर करून तो चार महिन्यांच्या थकबाकीसह रोखीने अदा करावा, अशी मागणी तालुका समन्वय समिती किनवट-माहूरचे सचिव एस.एस. धानोरकर यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.

याबाबत दिलेल्या निवेदनात धानोरकर यांनी नमूद केले आले आहे की, केंद्र सरकारने १ जानेवारी २०२५ पासून २ टक्के वाढीव महागाई भत्ता लागू करून तो रोखीने अदा केला आहे. त्यामुळे केंद्रीय कर्मचाऱ्यांचा महागाई भत्ता ५३ टक्क्यांवरून ५५ टक्क्यांपर्यंत वाढला आहे. मात्र, राज्य सरकारने अद्याप हा वाढीव भत्ता मंजूर, राज्य कर्मचाऱ्यांना लागू केला नाही. त्यामुळे राज्यातील शासकीय व निमशासकीय कर्मचाऱ्यांमध्ये असंतोष निर्माण झाला आहे.या पार्श्वभूमीवर राज्य शासनाने त्वरीत निर्णय घेऊन २ टक्के वाढीव महागाई भत्ता मंजूर करावा आणि जानेवारी ते एप्रिल २०२५ या चार महिन्यांच्या थकबाकीसह तो जून महिन्याच्या वेतनात रोखीने अदा करावा, अशी मागणी समन्वय समितीने केली आहे.

शासकीय व निमशासकीय कर्मचारी आर्थिक दृष्ट्या अडचणीत असून, महागाईचा दर सतत वाढत असताना भत्त्यावरील विलंब कर्मचाऱ्यांवर अन्यायकारक ठरत असल्याचेही समितीने नमूद केले आहे. त्यामुळे शासनाने तातडीने सकारात्मक निर्णय घेऊन कर्मचाऱ्यांना दिलासा द्यावा, असे निवेदनात स्पष्ट करण्यात आले आहे.

# महाराष्ट्र ध्यानयोगाच्या विशेष कार्यक्रमाचा हर्षोल्हासात समारोप



**नांदेड (प्रतिनिधी)–** दरवर्षीप्रमाणे २०२५ ह्या वर्षी देखील 'आर्ट ऑफ लिव्हिंग' इंटरनैशनल सेंटर बेंगलोर मार्फत खास उन्हाळी सुट्टीत महाराष्ट्र महोत्सव बेंगलोर येथील आश्रमात मोठ्या हर्ष उल्हासात संपन्न झाला. नांदेड जिल्ह्यातून तीनशेहून अधिक साधकांनी सहभाग नोंदविला.

लहान मुलांसाठी मेधा योगा लेव्हल वन व टू सोबतच उत्कर्ष योगा, कलर ऑफ जॉय आणि अठरा वर्षांवरील मराठी भाषिक नागरिकांसाठी इंटेंसिव एडवांस कोर्स, संयम वन, मराठी, हिंदी, इंग्रजी एडवांस मेडिटेशन कोर्स, इत्यादी विविध कोर्ससाठी महाराष्ट्राच्या वेगवेगळ्या जिल्ह्यातून तीन हजारांहून अधिक साधकांनी कोर्सचा लाभ घेतला.

त्यात नांदेडचे तीनशेहून अधिक साधक उपस्थित असल्याची माहिती आर्ट ऑफ लिविंगचे प्रशिक्षिक अंजली विजापुरे, मंगेश खानापुरे, आर्ट ऑफ लिव्हिंगचे युवाप्रिय स्वयंसेवक तथा सुप्रसिध्द वक्ते शिवाजीराजे पाटील बाभळीकर यांनी दिली आहे.

# कृषी मंत्री कोकाटे यांना मंत्रिपदावरून हटवा -कॉँग्रेस किसान सेलची मागणी

**नांदेड (प्रतिनिधी) –** राज्याचे कृषी मंत्री माणिकराव कोकाटे यांनी शेतीतल्या ढेकळाचे पंचनामे करायचे का, अशी असभ्य भाषा वापरून शेतकऱ्यांचा अपमान केला आहे. अशा बेजबाबदार मंत्र्याला मंत्रिपदावरून तातडीने दूर करावे, अशी मागणी राष्ट्रीय कॉँग्रेसच्या नांदेड जिल्हा किसान सेलने जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.



यावेळी किसान सेलचे जिल्हाध्यक्ष माधवराव पाटील पोवळे, प्रदेश उपाध्यक्ष अनिल पाटील चिमेगावकर, उत्तर नांदेडचे कार्याध्यक्ष बालाजी चव्हाण, डॉ. रेखा चव्हाण, सुरेंद्र घोडजकर, राजेश पावडे, श्रावण रॅपनवाड, सत्यपाल सावंत, बाबुराव पांडागळे महिला शहर अध्यक्षा डॉ. करुणा जमदाडे, इंजि. नसिमा पठाण, शशिकांत जोंधळे, गौरीशंकर मुळे, दीपकसिंघ हजुरिया आदींची उपस्थिती होती.

## स्मार्ट प्रकल्पांतर्गत राज्याबाहेरील प्रशिक्षणासह अभ्यास दौरा

**नांदेड (प्रतिनिधी)–** जिल्हा अंमलबजावणी कक्ष तथा प्रकल्प संचालक (आत्मा) स्मार्ट प्रकल्प नांदेडच्यावतीने नोडल अधिकारी अनिल शिरफुले यांच्या मार्गदर्शनाखाली बाळासाहेब ठाकरे कृषी व्यवसाय व ग्रामीण परिवर्तन (स्मार्ट) प्रकल्पांतर्गत राज्याबाहेरील प्रशिक्षणासह अभ्यास दौरा गुरुवारी आयोजित करण्यात आला आहे. या राज्याबाहेरील दौऱ्याच्या उदघाटनप्रसंगी जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी तथा प्रकल्प संचालक (आत्मा) दत्तकुमार कळसाईत यांनी हिरवा झेंडा दाखवून दौऱ्यास मान्यता दिली.

यावेळी नोडल अधिकारी स्मार्ट प्रकल्प अनिल शिरफुले समुदाय आधारीत संस्थेचे संचालक व प्रशिक्षणार्थी व इतर कर्मचारी उपस्थित होते. हा अभ्यास दौरा हा हळद संशोधन केंद्र, निजामाबाद, तेलंगाना राज्य येथे रवाना करण्यात आला आहे. स्मार्ट प्रकल्पांतर्गत मंजूर उपप्रकल्प समुदाय आधिारित संस्था शितलादेवी फार्मर प्रोड्युसर कंपनी लि. बारड व कै. संभाजी पवार फार्मर प्रो. कं.लि. आलुवडगाव या कंपनीमधील प्रत्येकी ५ प्रशिक्षणार्थी या अभ्यास दौऱ्या मध्ये पाठविण्यात आले. हे प्रशिक्षणार्थी केव्हीके, निजामाबाद येथील हळद संशोधन केंद्राला भेट देवून तेथील उपक्रम पाहून प्रशिक्षित होणार आहेत.

# जागतिक पर्यावरण दिनी शहरात मनपाच्यावतीने सुमारे १०० किलो प्लास्टीक कचऱ्याचे संकलन



**नांदेड (प्रतिनिधी)–** महापालिकेच्या वतिने जागतिक पर्यावरण दिनानिमित्त पर्यावरणाचे महत्त्व आणि लोकांमध्ये पर्यावरणाच्या संरक्षणाविषयी जनजागृती निर्माण करण्यासाठी १ जून ते ५ जून दरम्यान 'प्लास्टिक प्रदुषणाचा अंत' मोहीम राबविण्यात आले. या मोहिमे दरम्यान सुमारे १०० किलो प्लास्टिक कचऱ्याचे संकलन करण्यात आले.

दि.३ जून रोजी मनपा आयुक्त डॉ. महेशकुमार डोइफोडे यांच्या आदेशान्वये उपआयुक्त सौ. सुप्रिया टवलारे यांच्या मार्गदर्शनाखाली राज कॉर्नर ते छत्रपती चौक परिसर, कॅनॉल रोड, रेल्वे स्टेशन ते कुसुम सभागृह, रेस्ट हाउस ते छत्रपती चौक, बस स्टॅंड ते बाफना टी पॉइंट, देगलूर नाका ते ईदगाह कमान, लातूर फाटा ते नाईक कॉलेज या मार्गावर प्लास्टिक संकलन मोहिम व स्वच्छ भारत हरित भारत हरित प्रतिज्ञा शपथ घेण्यात आली.

या मोहिमेदरम्यान, सहाय्यक आयुक्त गुलाम मोहम्मद सादेख व प्रभाग क्रं. एक ते २० दरम्यानचे स्वच्छता निरीक्षक आणि पर्यावरण प्रेमी नागरिकांची उपस्थिती होती. या मोहिमे दरम्यान सुमारे १०० किलो प्लास्टिक कचऱ्याचे संकलन करण्यात आले.

# महावितरणकडून विद्युत सुरक्षा या विषयावर निबंध व चित्रकला स्पर्धेचे आयोजन



**नांदेड (प्रतिनिधी)–** नांदेड परिमंडळात महावितरण कंपनीच्या २० व्या वर्धापन दिनाच्या कार्यक्रमानिमित्त शून्य अपघात महावितरण, शून्य अपघात महाराष्ट्र या संकल्पनेनुसार दि. १ ते ६ जून २०२५ या कालावधीत वर्धापन दिन व विद्युत सुरक्षा सप्ताह साजरा करण्यात येत आहे.

नांदेड परिमंडळ अंतर्गत वर्धापन दिन व विद्युत सुरक्षा सप्ताह निमित्त 'विद्युत सुरक्षा' विषयावर निबंध व चित्रकला स्पर्धा घेण्यात आल्या. नांदेड परिमंडळ अंतर्गत नांदेड शहर, नांदेड ग्रामीण, भोकर, देगलूर, परभणी, सेलू व हिंगोली विभागात अधिकारी, कर्मचारी, कर्मचाऱ्यांच्या पाल्यासाठी आणी कुटुंबियासाठी तसेच शालेय विद्यार्थीसाठी 'विद्युत सुरक्षा' विषयी निबंध व चित्रकला स्पर्धा घेण्यात आली.

नांदेड मंडळात आयोजित निबंध व चित्रकला स्पर्धेत ६० विद्यार्थी, कर्मचारी व शालेय विध्यार्थ्यांनी भाग घेतला, परभणी मंडळात ५५ विद्यार्थी, कर्मचारी व शालेय विध्यार्थ्यांनी भाग घेतला. तर हिंगोली मंडळात १५ विद्यार्थी, कर्मचारी व शालेय विध्यार्थ्यांनी भाग घेतला. निबंध व चित्रकला स्पर्धेमध्ये भाग घेणाऱ्या पाल्यांना प्रमाणपत्र वितरित करण्यात आले.

जनता व वीज ग्राहकात वीज अपघाताबाबत जागरूकता निर्माण व्हावी, वीज अपघातांचे प्रमाण शून्यावर यावे म्हणून महावितरण कार्य करत आहे. मागील काही वर्षांमध्ये महावितरण कंपनीच्या कर्मचाऱ्यांचे अपघाताचे प्रमाण कमी करण्यात कंपनीला यश आले आहे. परंतु जनतेचे किंवा लहान मुलांचे विद्युत अपघात वाढतच चालले असल्याने समाजामध्ये देखील विद्युत सुरक्षा विषयी जनजागृती कार्यक्रम आयोजित करून अपघाताचे प्रमाण कमी होण्याच्या दृष्टीने २० व्या वर्धापन दिनाच्या निमित्ताने 'शून्य अपघात महावितरण... शून्य अपघात महाराष्ट्र...' ही संकल्पना घेऊन दि. १ ते ६ जून दरम्यान नांदेड परिमंडळात वर्धापन दिन व विद्युत सुरक्षा सप्ताह साजरा करण्यात येत आहे.

# नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेची 'स्वच्छ भारत, हरित भारत' करीता प्रतिज्ञा



**नवीन नांदेड (प्रतिनिधी)–** नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड स्वच्छ महाराष्ट्र अभियान (ना) जागतिक पर्यावरण दिनानिमित्त 'जागतिक स्तरावर प्लास्टिक प्रदुषणाचा अंत' ही मोहिम दि.०१ ते ०५ जून दरम्यान राबविण्यात आली.

पर्यावरणाचे महत्त्व पटवून देणे आणि लोकांमध्ये पर्यावरणाच्या संरक्षणा विषयी जनजागृती निर्माण करण्यासाठी दरवर्षी नांदेड महानगरपालिका असे जागृतीपर कार्यक्रम राबवित असते. त्या अनुषंगाने १ जून ते ०५ जून दरम्यान 'जागतिक स्तरावर प्लास्टिक प्रदुषणाचा अंत' या नावाची जागतिक पर्यावरण दिन मोहिम राबविण्यात आली.

मंगळवारी दि.०३ रोजी मनपा आयुक्त तथा प्रशासक डॉ. महेशकुमार डोइफोडे यांच्या आदेशान्वये उपआयुक्त सौ. सुप्रिया टवलारे, यांच्या मार्गदर्शनाखाली क्षेत्रिय कार्यालय क्रं.१ - राज कॉर्नर ते छत्रपती चौक परिसर, कॅनॉल रोड. क्षेत्रिय कार्यालय क्रं. २-२ रेल्वे स्टेशन ते कुसुम सभागृह क्षेत्रिय क्षेत्रिय कार्यालय क्रं.३- रेस्ट हाउस ते छत्रपती चौक. क्षेत्रिय कार्यालय क्रं.४- बस स्टॅंड ते बाफना टी पॉइंट. क्षेत्रिय कार्यालय क्रं.५- देगलूर नाका ते ईदगाह कमान. क्षेत्रिय कार्यालय क्रं. ६- लातूर फाटा ते नाईक कॉलेज या मार्गावर प्लास्टिक संकलन मोहिम राबविण्यात आली. तसेच स्वच्छ भारत हरित भारत ही प्रतिज्ञा घेण्यात आली. सहाय्यक आयुक्त गुलाम मोहम्मद सादेख व सर्व स्वच्छता निरीक्षक आणि पर्यावरण प्रेमी नागरिकांसह सर्वसामान्य नागरिकांनी या मोहिमेत सक्रीय सहभाग घेऊन स्वच्छ भारत हरित भारत ही प्रतिज्ञा घेतली.

# युवा

## अशा तरुणांचा मुलींना खूप येतो राग..!

**गर्लफ्रेंड-बॉयफ्रेंड असो की नवरा-बायको, प्रत्येक नात्यात दोन्ही बाजूंनी समंजस असणं महत्त्वाचं असतं. जर कधी पहिली व्यक्ती मागे गेली तर दुसऱ्याने जाऊन त्याची काळजी घ्यावी आणि कधी दुसरी व्यक्ती मागे राहिली तर पहिल्याने जाऊन त्याची काळजी घ्यावी. कोणतेही नाते असेच चालू असते. कोणत्याही नात्याचा विचार केला तर स्त्रिया त्यांच्या जोडीदारामध्ये काही गोष्टी पाहतात जसे की समोरच्या व्यक्तीचा विचार, त्याचा स्वभाव काय आहे, तो इतरांशी कसा वागतो इत्यादी. नात्यातील या गोष्टींमुळे तुमचे नाते एकतर मजबूत होऊ शकते किंवा ते कमकुवत होऊ शकते. कारण काहीवेळा नात्यात वाद होण्याचे कारण तुमच्या वाईट सवयी देखील असू शकतात ज्या तुम्ही त्वरित बदलल्या पाहिजेत. जाणून घ्या त्या ५ सवयींबद्दल ज्या महिलांना आवडत नाहीत किंवा ज्यामुळे तुमचे नाते कमकुवत होऊ शकते.**



- इमोशनली कनेक्टेड न राहणे : स्त्रियांना त्यांच्या पार्टनरने त्यांचे ऐकावे, त्यांच्याबद्दल सहानुभूती दाखवावी आणि त्यांना भावनिक आधार द्यावा असे वाटते. मात्र बऱ्याचदा मुले या गोष्टींकडे दुर्लक्ष करतात आणि त्यांना समजून घेण्याचा प्रयत्न करत नाहीत आणि जेव्हा स्त्रिया काही शेअर करण्याचा प्रयत्न करतात तेव्हा पुरुषांना ते समजत नाही, यामुळे महिलांना निराशा वाटू शकते. पुरुषांनी असे सतत केले तर नाते तुटू शकते. त्यामुळे मुलांनी याची विशेष काळजी घेतली पाहिजे आणि त्यांना भावनिक आधार दिला पाहिजे.
- जबाबदाऱ्या गांभीर्याने न घेणे : स्त्रिया अनेकदा आपल्या कुटुंबाची आणि घराची जबाबदारी आपल्या खांद्यावर घेतात, पण जर त्यांना जर पतीची काही घरगुती कामासाठी गरज भासत असेल आणि अशा परिस्थितीत तो घरच्या कामात मदत करत नसेल तर महिलांना ते आवडत नाही. समजा तुम्ही बाजारात जात आहात आणि तुमची पार्टनर तुम्हाला काही गोष्टी आणायला सांगते आणि तुम्ही ते करायला विसरलात तर काय होईल हे तुम्हाला चांगलं माहीत आहे. तुम्ही पाहिले असेलच की अनेक लोक आपल्या पत्नीला घरातील कामात मदत करतात आणि त्यांचे नाते किती चांगले चालते.
- टॉक्सिक रिलेशनशिप : कोणतेही नाते टॉक्सिक नसून प्रेमावर आधारित असते. खरं तर, काही पुरुष सुरुवातीपासूनच कठोर असतात आणि आपल्या फिलिंग्स कधी दर्शवत नाहीत, ज्यामुळे नातेसंबंधावर नकारात्मक परिणाम होतो. काही स्त्रियांना अशा पुरुषांची वागणूक आवडट नाही आणि अशा पुरुषांशी त्या इमोशनली कनेक्टेड राहत नाहीत. म्हणून, नेहमी मोकळेपणाने बोलाआणि प्रेमाने कोणतीही परिस्थिती हाताळा. जर तुम्ही असे केले नाही तर तुमची पार्टनर तुमच्या पासून दूर जाऊ शकते.
- प्रत्येक गोष्टीत दोषी ठरवणे : अनेक प्रकरणांमध्ये असे दिसून येते की पुरुष प्रत्येक निर्णयावर महिलांना दोष देतात किंवा त्यांना अशी वागणूक देतात की ज्यामुळे त्या कोणताही निर्णय घेऊ शकत नाहीत. जर तुम्ही देखील अशा लोकांपैकी एक असाल तर तुम्हाला सावध राहण्याची गरज आहे. अनेक स्त्रियांना त्यांच्या अनुभवांकडे, मतांकडे दुर्लक्ष केले जाते किंवा कमी लेखले जाते तेव्हा त्यांना अपमानास्पद वाटू शकते.
- जास्त वेळ फोनवर घालवणे, तिला वेळच न देणे : हल्लीचं जीवन खूप धकाधकीचं झालं आहे. एका घरात राहून माणसाला एकमेकांबद्दलच्या गोष्टी माहित नसतात. अशा परिस्थितीत महिला खूप भावूक असतात आणि आपल्या नवऱ्याने किंवा बॉयफ्रेंडने आपल्याला वेळ द्यावा, आपल्या समस्या जाणून घेऊन सपोर्ट करावा अशी इच्छा असते. अशावेळी जर तुम्ही सतत फोनमध्ये डोकं खुपसून बसला तर ते अजिबात तिला आवडत नाही. जेव्हा ती बोलत असते तेव्हा पूर्ण लक्ष हे तिच्याच बोलण्याकडे द्यावं अशी तिचं शुल्लक अपेक्षा असते. जे पुरूष हे करत नाहीत ते स्त्रियांना कधीच आवडत नाहीत.




**माझी जगायची इच्छा संपली आहे, अशी चिठ्ठी लिहून आयटी अभियंता असलेल्या तरुणीने इमारतीच्या २१व्या मजल्यावरून उडी मारून आत्महत्या केली. पुण्याच्या हिंजवडी येथील द क्राऊन ग्रीन सोसायटीमध्ये ३१ मे रोजी ही घटना घडली. अभिलाषा भाऊसाहेब कोथिंबिरे असे या २५ वर्षीय तरुणीचे नाव. अभिलाषा हिंजवडी आयटी पार्कमधील एका आयटी कंपनीत नोकरी करीत होती. अभिलाषाची आत्महत्या नैराश्यातून झाल्याचे दिसून येत आहे. आयटी अभियंता, गडगंज पगार तरीही तिला नैराश्य कशातून आलं, हे यथावकाश पोलीस तपासातून समोर येईलच. पण तरुणाईला सध्या नैराश्याने घेरल्याच्या अशा अनेक घटना वारंवार समोर येत आहेत. असे अनेक लोक आहेत जे नैराश्याच्या गर्तेत येऊन आत्महत्या करतात. पण नेमकं नैराश्य म्हणजे काय आणि याची लक्षणे काय आहेत? या आत्महत्या रोखता येऊ शकतात का? असे अनेक प्रश्न आपल्यासमोर उभे राहतात...**

# तरुणाई नैराश्याच्या विळख्यात!



### नैराश्य म्हणजे नेमकं काय?



डिप्रेशन ही एक अशी भावना आहे जी तुम्हाला अस्वस्थ करते आणि कोणत्याही कामातील तुमचे स्वारस्य काढून घेते. ही अशी स्थिती आहे जी तुम्हाला आत्महत्येच्या शेवटच्या टोकापर्यंत घेऊन जाते. आपल्यासह काहीच ठीक होत नाही आणि आपण काहीच करू शकत नाही अथवा आपल्याबरोबर काहीच ठीक होत नाही, आपल्याला आता काहीच मिळणार नाही अशा सतत विचारांनी मन ग्रासले जाते. रोजच्या आयुष्यात एकावर एक येणारे दुःख सहन न करता येणे आणि सतत घडणाऱ्या घटनांमुळे नैराश्य येण्याची क्रिया होत राहते. प्रेमात धोका मिळणे, नोकरी गमावणे, एखादी जवळची व्यक्ती गमावणे अशा अनेक कारणांमुळे नैराश्य येऊ शकते. वेदनेच्या भावना सतत येत राहिल्या तर हे मेजर डिप्रेशनचे कारण ठरते. साधारणतः २ आठवडे हे नैराश्य टिकते आणि याच दरम्यान नैराश्य आलेल्या व्यक्तींना सांभाळावे लागते अन्यथा आत्महत्येसारखे टोकाचे पाऊल अशा व्यक्ती उचलतात.

### काय आहेत नैराश्याचे प्रकार


**नैराश्याचेही वर्गीकरण करण्यात आले आहे. काही व्यक्तींना सौम्य नैराश्य असते तर तर काही व्यक्तींना अतिशय त्रासदायक असे नैराश्य जाणवते. नक्की कोणते प्रकार आहेत जाणून घ्या...**

- मेजर डिप्रेशन डिसऑर्डर : नैराश्याच्या सर्वात गंभीर प्रकारांपैकी हा एक प्रकार आहे. सतत दुःखी राहणे, निराशा येणं आणि आपण निरूपयोगी आहोत ही भावना सतत मनात बाळगणं. मनातून कधीही वाईट विचार निघून जात नाहीत आणि आत्महत्येला प्रवृत्त करणारे विचार सतत मनात घोळत राहतात.
- पर्सिस्टंट डिप्रेससी डिसऑर्डर : सतत नकारात्मक विचार आणि त्रास यामुळे साधारण २ वर्षे यातील लक्षणे दिसून येतात. सतत डिप्रेशन येणे आणि त्रास होणे याला डिस्टिमिया असेही म्हटले जाते.
- मॅनिक डिप्रेशन अथवा बायपोलर डिसऑर्डर : हायपोमेनिया आणि अति मूड बदलणे या पद्धतीचे हे डिप्रेशन असते. हे नैराश्य असणाऱ्या व्यक्तींचे मूड हे सतत मिनिटामिनिटाला बदलत असतात. या व्यक्ती दिवसरात्र काही ना काही करत असतात पण त्यांना अजिबातच थकवा येत नाही. त्यांना नैराश्याने ग्रासले आहे हे स्वतःलाही माहीत नसते.

### नैराश्याची नेमकी कारणे काय आहेत?


**बऱ्याच व्यक्तींना आपण नैराश्यामुळे असे वागत आहोत याची कल्पनाही नसते. साधारणतः ३० टक्के लोकांना अंशिक स्वरूपात डिप्रेशनची समस्या असते. याची नेमकी कारणे काय आहेत हे आपण जाणून घेऊया...**

- आत्मविश्वासाची कमतरता अथवा स्वतःला कमी लेखणे
- मानसिक अस्वास्थतेची अनुवंशिकता अथवा इतिहास असणे
- काही औषधांच्या सेवनामुळे त्रास
- तणावपूर्ण घटना आयुष्यात घडल्यामुळे
- आयुष्यातून महत्त्वाच्या व्यक्तीला गमावल्यामुळे
- आर्थिक समस्यांमुळे
- घटस्फोट झाल्यामुळे
- बाळ गमावल्यामुळे
- अनेक अशा गोष्टी आहेत, ज्यामुळे नैराश्याच्या गर्तेत माणूस जातो. याशिवाय डिप्रेशनला कोण विकसित करते अथवा कोण नाही हे प्रत्येक माणसाच्या विचार करण्याच्या क्षमेतवर अवलंबून असते.



### नैराश्यावरील उपचार

**नैराश्यासह जगणे अत्यंत कठीण आहे. पण यावरील उपचार घेऊन तुम्ही तुमचे जीवन अधिक चांगले करू शकता. त्यासाठी तुम्ही सायकोलॉजिस्ट अथवा सायकॅट्रिस्टची मदत घेऊ शकता. काय आहेत उपाय...**



- औषधे : डिप्रेशनच्या उपायासाठी डॉक्टर अधिकाधिक अँटीडिप्रेसेंट्स, Anxiety अथवा अँटीसायकोटिक औषधांच्या सेवनाचा सल्ला देतात. मात्र डॉक्टरांच्या सल्ल्याशिवाय कोणतेही औषध घेणे योग्य नाही आणि याचा ओव्हरडोसही घेऊ नये.
- सायकोथेरपी : आपल्या मनातील नकारात्मक भावना काढून टाकण्यासाठी तुम्ही सायकोथेरपी घेऊ शकता. यासाठी तुम्ही तुमच्या कुटुंबाचा आणि मित्रपरिवाराच्या मदतीचा हातही घेऊ शकता. तुमच्या मनातील विचार मांडून त्यातून काय मार्ग काढायचा हे ठरवणे अत्यंत गरजेचे आहे.
- व्यायाम : आठवड्यातून ३ ते ५ दिवस ३० मिनिट्स व्यायाम करणे आवश्यक आहे. तसंच योगधारणा केल्यास तुम्हाला त्याचाही फायदा मिळतो. तुमच्या हार्मोन्सना जपण्यासाठी अर्थात तुमचा मूड चांगला राखण्यासाठी याचा उपयोग होतो आणि लवकरात लवकर नैराश्यातून बाहेर निघू शकता.
- अल्कोहोल घेणे टाळा : दारू पिणे अथवा ड्रग्जचे सेवन करणे हे काही वेळासाठी चांगले वाटू शकते. पण जास्त काळ याचा वापर झाल्यास तुमच्या मनावर आणि शरीरावर त्याचा वाईट परिणामच होतो. त्यामुळे नैराश्यात असाल तर दारू अथवा ड्रग्जचे सेवन टाळा.
- आपली काळजी घ्यावी : रोज व्यवस्थित ८ तास झोप घ्यावी. हेल्दी डाएट खावे. नकारात्मक गोष्टींपासून दूर राहावे आणि आनंद होईल अशा गोष्टी अधिकाधिक प्रमाणात कराव्या. जेणेकरून नैराश्यातून दूर होण्यास मदत मिळते. नैराश्य हे आपल्या विचारांवर अवलंबून असते. त्यामुळे तुम्हाला जर आपण डिप्रेशन मध्ये आहोत हेच कळत नसेल तर मात्र वेळीच स्वतःकडे लक्ष द्या. लक्षणे तपासून पाहा. डॉक्टरांशी बोलून व्यवस्थित सल्ला घ्या आणि आनंदी राहा!

**लक्षणे कोणती? :** नैराश्य हे तुम्हाला सतत औदासिन्यता आणत असते. ही स्थिती अनेक काळापासून असेल तर त्याला नैराश्य असे म्हणतात. यामध्ये अनेक लक्षणे वेगवेगळ्या परिस्थितीत दिसून येतात. कधी ही लक्षणे असतात तर कधी नसतात. पुरूष, महिला आणि मुलांमध्ये वेगवेगळ्या प्रकारची लक्षणे दिसून येतात.

#### मूडसंबंधित लक्षणे...

- राग
- आक्रमकता
- चिडचिडेपणा
- चिंता
- सतत बेचैनी

#### भावनिक नैराश्य...

- आपल्याकडे काहीच राहिले नाही ही भावना
- उदास आणि दुःख
- निराशा
- वागणुकीतील नैराश्य
- कोणत्याही कामात मन न रमणं
- कितीही आवडतं काम असेल तरीही आनंद न मिळणं
- पटकन थकवा येणं
- सतत आत्महत्येचे विचार येणं
- अति दारूचे सेवन आणि ड्रग्जचा वापर
- वाईट कामांमध्ये मन रमणं आणि चुकीच्या कामांमध्ये रमण



#### झोपेबाबत नैराश्य...

- अनिद्रा/इन्सोम्निया
- कमी झोप येणे
- अति झोप येणे
- संपूर्ण रात्र झोपच न येणे
- डोकेदुखी
- पचनसमस्या

# मुलांना 'याच' रूपात हवी असते पत्नी!

**आपण सर्वजणच जाणतो की मुलांना नेहमीच आपल्या गर्लफ्रेंडला कुल आणि क्युट लुकमध्ये बघायला आवडते. पण एक मुलगी म्हणून तुम्हाला ही गोष्ट समजून घ्यायला हवी की आजकाल मुलं सुद्धा कोणत्याही मुलीची केवळ फिजीकला ब्युटी पाहून आकर्षित होत नाही. सध्याच्या मुलांमध्ये एक चांगला बदल दिसून आला आहे तो म्हणजे मुलं आपल्या गर्लफ्रेंड वा बायको मध्ये एक परिपूर्ण आणि सुसंगत पार्टनर शोधतात. एक असा पार्टनर जो अनेक गोष्टी न सांगता सुद्धा समजू शकेल. या लेखातून तुम्हाला अनेक मुलांची चॉईस आणि गर्लफ्रेंड बाबत असणारा त्यांच्या दृष्टीकोन याबद्दल माहिती मिळेल. मग तुम्ही सहज ही गोष्ट समजू शकाल की एखाद्या मुलाला आपल्या गर्लफ्रेंडला नक्की कोणत्या रुपात पाहायला आवडते...**

- जास्त ज्वेलरी नको... : प्रत्येक वेळी शरीरावर खूप सारे दागिने घालून फिरणाऱ्या मुली आजकालच्या तरुण मुलांना अजिबात आवडत नाहीत आणि हे सत्य आहे. हा जर एखादा सण समारंभ असेल आणि साडी परिधान केली असेल तर तेवढ्या एका दिसावापुरता त्या रूपात आपल्या पार्टनरला पाहणं मुलांना नक्कीच आवडतं, पण दररोज भरमसाठ ज्वेलरी घालून फिरणाऱ्या मुली फार काही त्यांच्या पसंतील उतरत नाहीत. त्यामुळे तुम्ही सुद्धा ही चूक करू नका आणि आपल्या ड्रेसच्या हिशोबानेच ज्वेलरी परिधान करा आणि नैसर्गिकरित्या सुंदर दिसण्यावर अधिकाधिक भर द्या. कारण मुलींनी त्यांची आवड व कम्फर्ट जपणं मुलांना आवडतं. त्यामुळे कोणाला खुश करण्यासाठी मुलींना मनाविरूद्ध मेकअप व ज्वेलरी कॅरी करण्याची काहीही गरज नाही.





### गोरेपणापेक्षा या गोष्टीवर असते बारीक नजर

आपल्या समाजातील अनेक मुलींना आजही हेच वाटते की, मुलांना फक्त गोऱ्या मुलीच आवडतात. ही गोष्ट काही वर्षांपूर्वी पर्यंत खरी होती सुद्धा, पण आताची मुलं पुढारलेल्या विचारांची आहेत. सध्याची शिकलेली, समजूतदार मुलं मुलींच्या स्कीनचा रंग कोणता याला जास्त प्राधान्य देत नाही. हा पण त्यांची एक अपेक्षा असते की आपल्या पार्टनरच्या स्कीनचा ग्लो मात्र नॅच्युरली खुललेला असावा. यामुळे अर्थातच ती सुंदर दिसते. तिला मेकअपची आवश्यक सुद्धा भासत नाही. म्हणून मुलींनो आपली स्कीन गोरी करण्याऐवजी ती हेल्दी व निरोगी ठेवण्यावर भर द्या. टॉप मीडिया संस्थेचे अँकर अभिषेक त्रिपाठी म्हणतात, जर एखाद्या मुलीला माझ्या आयुष्यात विशेष स्थान द्यायचे असेल, तर माझ्यासाठी तिच्या बाह्य रूपापेक्षा हे महत्त्वाचे आहे की, आम्ही दोघे एकमेकांसोबत किती कम्फर्टेबल आहोत. मग ती मेकअप करो किंवा न करो, दागिने किंवा कपडे कोणते घालते याने मला फारसा फरक पडत नाही. तिच्या फक्त या गोष्टींमध्ये सहजता, सोज्वळता आणि साधेपणा हवा.

- मुलींमध्ये मुलं नेमकं शोधतात तरी काय? : आजकालची मुलं मुलींच्या फिजिकल ब्युटीला जास्त प्राधान्य देत नाहीत. उलट ते लाईफ पार्टनर म्हणून एका मेंटली स्ट्रॉन्ग आणि मॅच्युअर मुलीच्या शोधात असतात. यातून तुम्ही समजून घेऊ शकता की जो मुलगा केवळ तुमची शारीरिक सुंदरता पाहून तुमच्यासोबत रिलेशनशिपमध्ये आला आहे किंवा ज्याचे लक्ष केवळ तुमचे कपडे, लुक्स आणि गोऱ्या रंगावर असते अशा मुलासोबत तुम्ही रिलेशनशिप मध्ये न राहिलेलेच बरे! कारण अशी मुले मुलींकडे फक्त एक टाईमपास म्हणून पाहत असतात.
- आजच्या पिढीतील मुलाचे मत : व्हिडिओ एडीटर म्हणून काम करणारा शिवांग प्रताप सिंह म्हणतो की, मला माझ्या गर्लफ्रेंडचा लुक कसा आहे, ती काळी आहे की गोरी आहे याबद्दल काहीच फरक पडत नाही. हा पण तिची ड्रेसिंग सेन्स चांगली असायला हवी आणि ती जॉली नेचरची असली पाहिजे. माझ्यासाठी सौंदर्य हे दुय्यम स्थानावर येते, मी जास्तीत जास्त प्राधान्य तिच्या स्वभावाला देतो. तिच्यात मॅच्युरिटी असावी आणि ती खूप समजूतदार असावी ही एक माझी अपेक्षा असते. महत्त्वाची गोष्ट म्हणजे जरी ती कधी विदाउट मेकअप माझ्या सोबत आली तरी मला काही वाटत नाही.
- जास्त मेकअप नको : मुलींना मेकअप करायला खूप आवडतो. गी गोष्ट चांगलीच आहे. पण खूप मेकअप करायला आवडतो ही गोष्ट किंचित वाईट आहे. कारण मुलांना जास्त मेकअप थापून फिरणाऱ्या मुली आवडत नाहीत हे निदर्शनास आले आहे. मुलींचे खास करून प्रेयसी किंवा पत्नीचे सौंदर्य जितके नैसर्गिक असेल तेवढी ती मुलगी अधिकाधिक आकर्षक दिसते. मुलींनी डोळ्यात हलके काजळ लावलेले मुलांना खूप आवडते. म्हणून तुम्ही काजळ, मस्कारा आणि आयपपेन्सिलचा वापर अवश्य करा. खास गोष्ट ही आहे की तुम्ही दिवसा किंवा रात्री कोणत्याही वेळी यांचा वापर बिनधास्त करू शकता आणि एक मस्त लुक मिळवू शकता.

# राज्यात यंदा दहा कोटी वृक्षलागवड करणार –मुख्यमंत्री फडणवीस

**मुंबई (प्रतिनिधी)** – राज्यातील वनाच्छदनाची टक्केवारी वाढविण्यासाठी हरित महाराष्ट्र, समृद्ध महाराष्ट्र या अभियानाअंतर्गत यावर्षी राज्यात १० कोटी वृक्ष लागवड करण्यात येणार असल्याची घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केली. पुढील वर्षीही दहा कोटी वृक्ष लागवड करण्याचे उद्दिष्ट आहे. वृक्षारोपण ही लोकचळवळ झाली तरच ही मोहीम यशस्वी होईल. त्यासाठी सर्वांनी एकत्रितपणे काम करावे, अशा सूचना मुख्यमंत्र्यांनी यावेळी दिले.



हरित महाराष्ट्र, समृद्ध महाराष्ट्र अभियान अंतर्गत वृक्ष लागवड मोहिमेसंदर्भात सह्याद्री अतिथीगृह येथे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली बैठक झाली. यावेळी उपमुख्यमंत्री अजित पवार, वन मंत्री गणेश नाईक, राज्यमंत्री आशिष जयस्वाल, मुख्य सचिव सुजाता सौनिक, अपर मुख्य सचिव मिलिंद म्हैसकर यांच्यासह विविध विभागांचे सचिव, वन विभागाचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, पर्यावरण संतुलन राखण्यासाठी वृक्षारोपण आवश्यक आहे. देशात सर्वाधिक वनाच्छदन वाढविण्यात महाराष्ट्रात अग्रेसर आहे. राज्यातील ३३ टक्के वनाच्छदनाचे उद्दिष्ट गाठण्यासाठी पुढील वीस वर्षे हरित महाराष्ट्र, समृद्ध महाराष्ट्र हे अभियान मोहिम स्वरुपात राबविणे आवश्यक आहे. महाराष्ट्राने गेल्या आठ वर्षात मोठ्या प्रमाणात वृक्ष लागवड केली आहे. यापूर्वी ३३ कोटी व ५० कोटी झाडे लावण्याचे उद्दिष्ट यशस्वीपणे गाठले आहे. त्यामुळे यंदाच्या वर्षीचे उद्दिष्ट नक्कीच पूर्ण करता येईल. वृक्षारोपणात किमान दिड ते तीन वर्षे वयाची रोपे लावण्यात यावीत. लावलेली झाडे टिकतील, वाढतील यासाठी प्रयत्न व्हावेत. तसेच लावलेल्या वृक्षारोपणाची जगण्याची टक्केवारी वाढावी, यासाठी कृत्रिम बुद्धिमत्तेसारख्या आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करावा. तसेच यासाठी रिमोट सेन्सिंग, उपग्रह आदी साधनांचाही वापर करून पारदर्शकपणे कामे होण्याकडे लक्ष द्यावे.

दहा कोटी वृक्ष लागवड मोहिमेसाठी सर्व विभागानी जागा तसेच दर्जेदार रोपे निश्चित करावीत. वृक्षारोपण मोहिमेमध्ये स्थानिक स्वराज्य संस्था, जिल्हा परिषदांनी सहभाग घ्यावा. तसेच सामाजिक संस्थांनाही यामध्ये सहभागी करून घ्यावे. दहा कोटी झाडे लागवडीच्या मोहिमेच्या यशाचे गमक हे चांगली नर्सरी आहे. त्यामुळे उद्दिष्ट पूर्तीसाठी आवश्यक व दर्जेदार रोपे मिळावीत, यासाठी नर्सरी तयार करणे आवश्यक आहे. तसेच खासगी नर्सरीमध्ये चांगली रोपे तयार होतील, याकडे लक्ष द्यावे. प्रादेशिक परिस्थितीनुसार झाडांची लागवड करण्यात यावी. वृक्षारोपण अभियानाच्या कामासाठी 'कॅम्पा'अंतर्गतचा निधीचा पुरेपूर वापर करावा, असे निर्देशही त्यांनी यावेळी दिले.

राज्यातील राष्ट्रीय महामार्ग, राज्य महामार्ग तसेच पालखी मार्गाच्या कडेला वृक्षारोपण करण्याच्या कामाची जबाबदारी आता वन विभागाकडे सोपविण्यात येईल. त्याचप्रमाणे गडचिरोली जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात उद्योग येत आहेत. त्यामुळे या जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात वृक्ष लागवड होणे आवश्यक आहे. त्यासाठी पुढील वर्षी गडचिरोली जिल्ह्यात १ कोटी झाडे लावण्याचा विचार असून लवकरच त्याबाबत निर्णय घेतला जाणार आहे.

# पैसे घेऊन पेपर विकला, प्राध्यापकासह विद्यार्थी अटकेत

**पुणे (प्रतिनिधी)** – शिक्षणाचं माहेरघर अशी ओळख असलेल्या पुण्यात शिक्षकाने विद्यार्थ्यांना परिक्षेत पास करतो म्हणत लाखो रुपये उकळल्याचा संतापजनक प्रकार समोर आला आहे. इंजिनिअरिंगच्या पहिल्या वर्षीचा गणिताचा पेपर पास करून देण्यासाठी पुण्यातील वाघोली भागात असलेल्या पार्वतीबाई गेनबा मोझे या महाविद्यालयातील एका प्रोफेसरने विद्यार्थ्यांकडून लाखो रुपये उकळल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. पुणे पोलिसांच्या गुन्हे शाखेने कारवाई याप्रकरणी कारवाई करत या प्रोफेसरसह चौघांना बेड्या ठोकल्या आहेत. परिक्षेत पास करण्यासाठी विद्यार्थ्यांकडून १० ते १५ हजार रुपये घेत असल्याचं समोर आलं आहे.



प्राध्यापक प्रतिक किसन सातव यासह आदित्य खिलारे, अमोल नागरगोजे, अनिकेत रोडे अशी अटक केलेल्या आरोपींची नावे आहेत. प्राध्यापक सातव हा कॉलेजमध्ये दुपारी झालेला पहिल्या वर्षांचा इंजिनियरींगच्या गणिताचा पेपर रात्री कॉलेजमध्ये इंजिनीयरींगचे शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांना पुन्हा लिहिण्यासाठी देत होता. आरोपीकडून सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे गणित २ या विषयाचे लिहिलेल्या उत्तरपत्रिकेचे ६ बंडल तसेच रोख रक्कम २ लाख ६ हजार रुपये व उत्तरपत्रिका ठेवण्यात आलेल्या कंट्रोल रूमची चावी असा मुद्देमाल पोलिसांनी जप्त केला आहे. गणित २ या विषयामध्ये नापास होण्याची भिती वाटते अशा विद्यार्थ्यांना हेरून त्यांच्याकडून स्वतःचे आर्थिक फायद्यासाठी संगनमत करुन १० ते ५० हजार रुपये मागायचे आणि त्याबदल्यात त्यांना पुन्हा एकदा परिक्षा सोडवायला देत होते.

वाघोलीतील बायफ रस्त्यावरील पार्वतीबाई गेणबा मोझे कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग या अभियांत्रिकी महाविद्यालयातील एका प्राध्यापकाने विद्यार्थ्यांकडून पैसे घेऊन त्यांच्याकडून रात्री प्रश्नपत्रिका सोडवून घेतल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. विशेष म्हणजे, परीक्षा झाल्यानंतर देखील रात्री परत तेच पेपर विद्यार्थ्यांना लिहण्यासाठी हा प्राध्यापक देत होता. त्यासाठी दहा ते पन्नास हजार रुपयांचा रेट ठेवत होता. दरम्यान, गुन्हे शाखा युनिट-६ च्या पथकाला या टोळीची माहिती मिळाली आणि हा संपूर्ण गैरप्रकार उजेडात आला.याप्रकरणी प्राध्यापकासह विद्यार्थ्यांना अटक केली आहे. त्यांच्याकडून इंजिनिरिंग मॅथेमॅटिक्स उत्तरपत्रिकेचे सहा बंडल, दोन लाख सहा हजार रुपये, उत्तरपत्रिका ठेवलेल्या कक्षाची चावी, असा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

या प्रकरणातील मुख्य आरोपी प्राध्यापक प्रतीक सातव आणि साथीदारांनी ज्या विद्यार्थ्यांना गणित- २ विषयात नापास होण्याची भीती होती अशा विद्यार्थ्यांना त्यांनी हेरलं. सातव आणि साथीदारांनी विद्यार्थ्यांकडून प्रत्येकी १० ते ५० हजार रुपये घेतले. अभियांत्रिकी महाविद्यालयातील परीक्षा कक्षाची (कंट्रोल रूम) बनावट चावी तयार करून घेतली. या चावीचा वापर करून गणित- २ विषयाच्या उत्तरपत्रिकांचे सहा सीलबंद बंडल काढून घेतले. विद्यार्थ्यांनी सोडविलेल्या उत्तरपत्रिका काढून घेतल्या. उत्तरपत्रिका पुन्हा लिहिण्यासाठी दिल्या होत्या.

# विमानतळावर ५२ कोटी रुपयांचे कोकेनसह एकास अटक

मुंबई (प्रतिनिधी) - एअर इंटेलिजन्स युनिटच्या अधिकाऱ्यांनी मुंबईत छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळावर एकाला अटक केली. अटक केलेल्या व्यक्तीकडून एअर इंटेलिजन्स युनिटच्या अधिकाऱ्यांनी ५२ कोटी रुपयांचे कोकेन जप्त केले. नैरोबीच्या एका हँडलरने ड्रग्जची तस्करी करण्यासाठी १५०० अमेरिकन डॉलर दिल्याची कबुली अटक केलेल्या व्यक्तीने दिली.

नेरोबी येथून आलेल्या केनेडी चेगे या केनियाच्या नागरिकाला एअर इंटेलिजन्स युनिटच्या अधिकाऱ्यांनी मुंबईत छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळावर अटक केली. केनेडी चेगेकडून ५२ कोटी रुपयांचे कोकेन जप्त करण्यात आले. कंबरेचा पट्टा आणि काफ सपोर्टर यात लपवलेल्या पाकिटांमधून केनेडी चेगेने कोकेनची तस्करी केली होती. एअर इंटेलिजन्स युनिटने केनेडी चेगेच्या सामानातून ५१९४ ग्रॅम कोकेन जप्त केले.

# सिंधुताईंच्या आश्रमातील मुली लग्नासाठी देतो म्हणत पैशांची मागणी; भामट्यांविरुद्ध गुन्हा दाखल

**पुणे (प्रतिनिधी)** – अनाथांची माय म्हणून महाराष्ट्रासह देशाला परिचित असलेल्या दिवंगत सिंधुताई सपकाळ यांच्या नावाचा गैरवापर करुन तरुणाईला फसवण्याचा प्रकार समोर आला आहे. सिंधुताई सपकाळ यांच्या पुण्यातील आश्रमात लग्नासाठी मुली आहेत, असं म्हणत अनेकांची फसवणूक झाल्याचा प्रकार समोर आला आहे. लग्नासाठी इच्छुक असलेल्यांना फोन करून या सगळ्या संदर्भातली माहिती दिली जाते आणि त्यानंतर रजिस्ट्रेशन म्हणून १५,००० रुपये फोन पे किंवा google पे ने मागवले जातात. या सगळ्या संदर्भात दोन दिवसांपूर्वी सपकाळ यांनी सासवडमध्ये तक्रार दिली होती. मात्र, दोन दिवसांनी सासवड पोलिसांनी गुन्हा दाखल करण्याचा निर्णय घेतला.

सिंधुताई सपकाळ यांच्या नावाचा गैरवापर करत मुलगी लग्नाला देतो म्हणणाऱ्या भामट्यावर फसवणुकीचा गुन्हा दाखल झाला आहे. सिंधुताई सपकाळ यांच्या आश्रमात लग्नासाठी मुली आहेत असं म्हणत अनेकांची फसवणूक झाल्याचा प्रकार समोर आला आहे.

फोन करून या सगळ्या संदर्भातली माहिती दिली जाते आणि त्यानंतर रजिस्ट्रेशन म्हणून १५,००० रुपये फोन पे ने किंवा google पेने मागवले जातात. या सगळ्या संदर्भात दोन दिवसांपूर्वी सपकाळ यांनी सासवडमध्ये पोलीस ठाण्यात तक्रार दिली होती. मात्र, याप्रकरणी दोन दिवसांनी सासवड पोलिसांनी गुन्हा दाखल करण्याचा निर्णय घेतला आहे. त्यानुसार, ३१९ (४), ३१८ (४), ३५६ (२), आयटी ॲक्ट ६६ या कलम अंतर्गत गुन्हा दाखल केला आहे.

# भरधाव कार थेट बंगल्यात घुसली; पाच जणांचा मृत्यू

**नाशिक (प्रतिनिधी)** – नातेवाईकाच्या लग्नसमारंभातून परतत असलेल्या नामपूर येथील भदाण कुटुंबीयांच्या कारचा भीषण अपघात झाला. कार चालकाचे नियंत्रण सुटल्याने ही कार नाशिक-कळवण रस्त्यालगत कोल्हापूर फाट्याजवळ एका बंगल्यावर जाऊन आदळली. ही दुर्घटना रात्री सुमारे १० वाजण्याच्या सुमारास घडली.

अपघातात नामपूर व देवळा येथील पाच जणांचा दुर्दैवी मृत्यू झाला तर दोन जण गंभीर जखमी झाले आहेत. जखमींवर नाशिकमधील रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

नामपूर येथील भदाण कुटुंबीय नाशिकमध्ये नातेवाईकाच्या लग्नसमारंभासाठी गेले होते. समारंभ आटोपून सटाण्याकडे परतत असताना, कार (एमएच ४१ बीई ५४४३) चालवणाऱ्या चालकाचा गाडीवरील ताबा सुटला. यामुळे कार थेट विठोबा शंकर अहेर यांच्या बंगल्यावर जाऊन आदळली.

# महाराष्ट्र सदनात कंपोस्ट पिट प्रकल्पाचे निवासी आयुक्त विमला यांच्या हस्ते भूमिपूजन

**मुंबई (प्रतिनिधी)** – जागतिक पर्यावरण दिनाचे औचित्य साधून कोपर्निकस मार्क स्थित महाराष्ट्र सदनात कंपोस्ट पिटच्या प्रकल्पाचे निवास आयुक्त तथा सचिव आर. विमला यांच्या हस्ते भूमिपूजन करण्यात आले. या पर्यावरणपूरक उपक्रमाचा उद्देश महाराष्ट्र सदन परिसरातील पालापाचोळा आणि दोन कँटीनम धून निघणाऱ्या जैविक कचऱ्याचे प्रभावी व्यवस्थापन करून सेंद्रिय खत तयार करणे, असा असल्याचे निवासी आयुक्त आर. विमला यांनी यावेळी सांगितले.



कोपर्निकस मार्गस्थित महाराष्ट्र सदन परिसरात असलेल्या मुबलक झाडांमुळे दररोज मोठ्या प्रमाणात पालापाचोळा आणि दोन्ही कँटीनम धून उरलेला भाजीपाला, तसेच इतर सेंद्रिय कचरा जमा होतो. या कचऱ्याचा पर्यावरणपूरक पद्धतीने वापर करण्यासाठी ३ टन क्षमतेचे दोन कंपोस्ट पिट्स उभारण्याचा निर्णय कर्मचाऱ्यांच्या सामूहिक चर्चेतून घेतला असल्याचे सांगून श्रीमती आर विमला म्हणाल्या, या पिटमधून तयार होणारे सेंद्रिय खत परिसरातील विस्तीर्ण बागा आणि झाडांना पोषक ठरेल, ज्यामुळे हरित क्षेत्र अधिक समृद्ध आणि टिकाऊ होईल. हा उपक्रम पर्यावरण संरक्षणाच्या दिशेने उचललेले एक महत्त्वाचे पाऊल आहे. कंपोस्ट पिटमुळे जैविक कचऱ्याचे व्यवस्थापन प्रभावीपणे होईल आणि नैसर्गिक खतामुळे महाराष्ट्र सदनातील बागांचे सौंदर्य तसेच पर्यावरणीय समतोल वाढेल, असेही श्रीमती आर. विमला यांनी यावेळी सांगितले.

या भूमिपूजन कार्यक्रमाला सहाय्यक निवासी आयुक्त डॉ. राजेश आडपावार, स्मिता शेलार, सारिका शेलार, महाराष्ट्राचे व्यवस्थापक प्रमोद कोलते, निवासी अभियंता किरण चौधरी, सेक्शन इंजिनियर जेपी गंगवार, ज्युनिअर इंजिनियर, प्रियंका नागे यांच्यासह कर्मचारी उपस्थित होते.

# मारोती कसाब यांच्या 'रातंदिन असे' काव्यसंग्रहाचा 'एमजीएम' विद्यापीठाच्या अभ्यासक्रमात समावेश

**अहमदपुर (प्रतिनिधी)**– येथील महात्मा फुले महाविद्यालयातील मराठी विभागाचे प्राध्यापक डॉ. मारोती कसाब यांनी लिहिलेल्या 'रातंदिन असे' या काव्यसंग्रहाचा छत्रपती संभाजीनगर येथील एमजीएम विद्यापीठाच्या एम. ए. मराठी अभ्यासक्रमात समावेश करण्यात आला आहे. ज्येष्ठ साहित्यिक, पत्रकार तथा महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. वसंत बिरादार पाटील यांच्या हस्ते डॉ. कसाब यांचा सत्कार करण्यात आला.




महात्मा गांधी मिशन संचलित एमजीएम विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर यांच्या वतीने नवीन शैक्षणिक धोरणाला अनुसरून एम.ए. मराठीचा नवीन अभ्यासक्रम तयार करण्यात आला आहे. एम.ए. द्वितीय वर्ष तिसऱ्या सत्रात 'विशिष्ट साहित्य प्रकाराचा अभ्यास- कविता' या अभ्यास पत्रिकेत डॉ. मारोती कसाब यांनी लिहिलेल्या 'रातंदिन असे' या कविता संग्रहाचा समावेश करण्यात आला आहे.

डॉ. मारोती कसाब यांचे 'पोरगं शेकत बसलंय', 'रातंदिन असे' या दोन काव्यसंग्रहासह 'समकालीन साहित्य आणि समीक्षा', 'सीमालढ्याचे नायक भाई बापूसाहेब एकंबेकर', 'शंकर भाऊ साठे व्यक्तित्व आणि कर्तृत्व', 'मातंग : इतिहास आणि संस्कृती' आदी ग्रंथ प्रसिद्ध आहेत.

'रातंदिन असे' या काव्यसंग्रहातील कविता म्हणजे 'कपाळी लोकशाहीचा मळवट भरून क्रांतीचा उद्घोष करणारी वास्तववादी कविता आहे' अशा शब्दांत प्राचार्य डॉ. वसंत बिरादार पाटील यांनी मारोती कसाब यांच्या कवितेचा गौरव केला.

समकालीन राजकारणावर परखड भाष्य करणारी ही कविता नवी सांस्कृतिक मांडणी करणारी आहे, असेही ते यावेळी म्हणाले. यावेळी उपप्राचार्य डॉ. दुर्गादास चौधरी, सांस्कृतिक विभाग प्रमुख डॉ. पांडुरंग चिलगर, राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी डॉ. बब्रुवान मोरे, डॉ. सतीश ससाणे, डॉ. नागराज मुळे, डॉ. प्रकाश चौकटे, डॉ. सचिन गर्जे यांच्यासह महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक व कर्मचारी उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ह. भ.प. डॉ. अनिल महाराज मुंढे यांनी केले तर आभार शीघ्रकवी उपप्राचार्य डॉ. दुर्गादास चौधरी यांनी मानले.

# आधार नोंदणी केंद्र मिळवून देतो म्हणत तरुणांची लाखो रुपयांची फसवणूक

**हिंगोली (प्रतिनिधी)** – महाआयटीच्यावतीने बेरोजगार तरुणांना आधार कार्ड नोंदणी केंद्र चालवण्यासाठी दिले जातात. या केंद्रावर नागरिकांचे नव्याने आधार कार्ड तयार करणे, दुरुस्ती करणे आणि अपडेट करण्याचं काम केलं जातं. परंतु हेच आधार कार्ड नोंदणी केंद्र तुम्हाला देतो, असं म्हणून तरुणांची लाखो रुपयांची फसवणूक करण्यात आली आहे. तशी तक्रार जिल्हाधिकाऱ्यांकडे करण्यात आली आहे. दरम्यान बेरोजगार तरुणांची फसवणूक झाल्याने व्याजाने पैसे काढून फसवणूकदारला दिल्याने आता काही तरुणांवर फाशी घेण्याची वेळ आली आहे. अशातच हे प्रकरण उजेडात आल्याने जिल्ह्यात सर्वत्र एकच खळबळ उडाली आहे.

हिंगोली जिल्ह्यामध्ये महाआयटीचे जिल्हा समन्वयक सागर भुतडा यांनी आधार कार्ड नोंदणी केंद्र मिळवून देतो, अस आश्वासन देऊन बेरोजगार तरुणांच्या कडून लाखो रुपये उकळण्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. जिल्हाभरामध्ये महा आयटीच्या वतीने वेगवेगळ्या खाजगी कंपनीच्या माध्यमातून बेरोजगार तरुणांना आधार कार्ड नोंदणी केंद्र दिले जातात. त्यासाठी अगोदर एक परीक्षा घेतली जाते आणि त्या परीक्षेत पास झाल्यानंतर आधार कार्ड नोंदणी केंद्राचा ताबा या तरुणाकडे दिला जातो. परंतु हे नोंदणी केंद्र देण्यापूर्वी सागर भुतडा हे संबंधित बेरोजगार तरुणांकडे पैशाची मागणी करत असतात. असाच प्रकार हिंगोली जिल्ह्यातील बेरोजगार तरुण बालाजी कोंघे यांच्यासोबत सुद्धा घडला आहे.

तुला आधार कार्ड नोंदणी केंद्र मिळवून देतो. तू मला एक लाख रुपये दे, अशी ऑफर सागर भुतडा यांनी बालाजी कोंघे यांना दिली. कामाची गरज असल्याने बालाजी यांनी या ऑफरला समर्थन दिले आणि व्याजानं पैसे घेऊन भुतडा यांना ५० हजार रुपये फोन-पे द्वारे पाठवले. त्यानंतर वारंवार भुतडा यांनी सांगितलेल्या फोन पे नंबर वर बालाजी यांनी वेगवेगळी रक्कम पाठवली, अशी एकूण ९८ हजार रुपये रक्कम पाठवली. त्यानंतर प्रत्येक महिन्याला २२०० रुपये द्यावे लागतील, या अटीसह बालाजी यांना एक आधार कार्ड नोंदणी संच देण्यात आला. परंतु आधार कार्ड नोंदणी संच चार महिने उलटूनही चालू (ॲक्टिव्हेट) होत नसल्याने बालाजी यांनी तो आधार नोंदणी संच औंढा नागनाथ येथील महिला व बालविकास प्रकल्प अधिकारी कार्यालयामध्ये सुपूर्द केला.

त्यानंतर हा आधार कार्ड नोंदणी संच मिळवण्यासाठी कोणतेही पैसे लागत नाहीत, हे कळल्यानंतर आपली फसवणूक झाल्याचं बालाजी कोंघे यांच्या लक्षात आलं. त्यावरून त्यांनी जिल्हाधिकाऱ्याकडे तक्रार देत याप्रकरणी महाआयटीचे जिल्हा समन्वयक भुतडा यांच्याकडून माझी फसवणूक झाली, असून त्यांच्यावर कारवाई करण्याची मागणी केली आहे. बालाजी कोंघे यांच्याप्रमाणेच जिल्ह्यातील अनेक बेरोजगार तरुणांची अशाच पद्धतीनं फसवणूक करून सागर भुतडा यांनी लाखो रुपयांची माया जमविल्याचे तक्रारीत म्हटले आहे.

# ३ कोटींचं बक्षीस असलेला नक्षलवाद्यांचा नेता ठार

**छत्तीसगड (प्रतिनिधी)**– छत्तीसगडच्या इंद्रावती नॅशनल पार्कच्या जंगलात सुरक्षा दलांनी मोठी कारवाई केली. नक्षली चळवळीतील अत्यंत मोठा नेता आणि केंद्रीय समितीचा सदस्य सिंहाचलम याला पोलिसांनी चकमकीत ठार केलं.



या नक्षलवादी सिंहाचलम राज्यभरात सातत्याने कारवाया करत होता. अखेर गडचिरोली सीमेपासून जवळच असलेल्या भागात ही मोठी कारवाई घडली. वरिष्ठ माओवादी कार्यकर्त्यांच्या उपस्थितीची माहिती मिळाल्यानंतर सुरक्षा कर्मचाऱ्यांच्या संयुक्त पथकाने नक्षलविरोधी मोहीम सुरू केली तेव्हा इंद्रावती राष्ट्रीय उद्यानातील जंगलात गोळीबार सुरू झाला होता.

सिंहाचलम हा गेल्या ४० वर्षांपासून नक्षल चळवळीत सक्रीय होता. तो नक्षलवाद्यांच्या केंद्रीय समितीमध्ये महत्त्वाची भूमिका बजावत होता. विशेषतः नक्षल प्रचार आणि शिक्षण विभागाची जबाबदारी त्याच्याकडे होती. त्याच्यावर महाराष्ट्र, छत्तीसगड, तेलंगणा, ओडिशा आणि आंध्रप्रदेश अशा ५ राज्यांत गंभीर गुन्हे दाखल होते. या राज्यांनी त्याच्यावर मिळून तब्बल ३ कोटी रुपयांचे बक्षीस जाहीर केलं होतं.

छत्तीसगडच्या इंद्रावती नॅशनल पार्कच्या जंगलात सुरक्षा दलांनी मोठी कारवाई करत नक्षल चळवळीतील अत्यंत मोठा नेता आणि केंद्रीय समितीचा सदस्य सिंहाचलम याला चकमकीत ठार केलं. अखेर गडचिरोली सीमेपासून जवळच असलेल्या भागात ही मोठी कारवाई घडली. ही चकमक इंद्रावती नॅशनल पार्कच्या घनदाट जंगलात झाली. येथे नक्षल चळवळ सुरू असल्याची माहिती सुरक्षा यंत्रणांना मिळाली होती. नक्षलविरोधी मोहिमेअंतर्गत सीआरपीएफ व स्थानिक पोलिसांनी संयुक्तपणे शोध मोहीम राबवली असता दोन्ही गटांमध्ये जोरदार चकमक उडाली. यामध्ये सिंहाचलम ठार झाला. घटनास्थळी मोठ्या प्रमाणात शस्त्रसाठा व नक्षल साहित्य जप्त करण्यात आलं आहे. या चकमकीनंतर गडचिरोली, सिरोंचा आणि अहेरी भागात सुरक्षा यंत्रणांनी हाय अलर्ट जाहीर केला आहे.


## कुत्रीचे पिल्ले विकणे आहे

डॉबर मॅन, जर्मन शेफर्ड, ग्रेडन, लेबरा डॉग, पामोलियन इत्यादी १२० प्रकारच्या जातीची कुत्रीचे पिल्ले मिळतील.

संपर्क गोपालअण्णा
डॉग डिलर
मोबाईल नंबर
९८५०६८८५२८




## जाहीर प्रगटन

संचिका क्रमांक. ३/४०/२०२५- २०२६/
क्षे.का.क्र.६ सिडको

प्रकरण :- नांव परिवर्तन करणे बाबत.

जाहिर प्रगटनाद्वारे सर्व जनतेस कळविण्यात येते की,सौ.कमलबाई भ्र.अशोक वटंबे रा.श्रीपदानगर कौठा ता.जि. नांदेड यांनी या कार्यालयात अर्ज सादर केला आहे की,मनपा सिडको घर क्र.टाईप/ सेक्टर शेत सर्व्हे नंबर- मधील गट नंबर २५५ पैकी प्लॉट नंबर ४ एकूण १११.५२ चौरस मीटर मनपा मालमत्ता क्र.१०-२ पिन क्र.४०५१००४६२४ आहे. श्री सचिन अशोक वटंबे व सचिन पि.दत्ता नरबागे रा.कौठा नांदेड यांच्या नावे नोंद असलेली मालमत्ता अर्जदाराने खरेदीखत/ विक्रीखत/ बक्षीसपत्र/ सोसायटी कन्व्हेसडिड व ओर्नरशीप पद्धतीचे विक्रीखत/ भाडेपत्र हस्तांतरण विक्रीखत दस्त क्र.३५७७/२०१५ दिनांक २६/६/२०१५ व सातबारा दिनांक ---२०२५ अधारे प्राप्त झाली आहे.

तरी त्यांचे नावाची नोंद नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेच्या मालमत्ता कर आकारणी नोंदवहीत घेण्यात येत आहे. तरी या सबंधात कोणी काही आक्षेप असल्यास त्यांना हे जाहीर प्रगटन प्रसिद्ध झालेल्या तारखेच्या १५ दिवसांच्याआत कार्यालयात आपला लेखी आक्षेप पुराव्यासह दाखल करावा. अन्यथा वरील अवधी संपल्यानंतर सदरील मालमत्तेवर अर्जदाराचे नावाने मालमत्ता कर आकारणी नोंदवहीत सदरील नावाची नोंद घेण्यात येईल. चर्तुसिमा-पुर्वेस-प्लॉट नंबर ५,पश्चिमेस-प्लॉट नंबर ३, दक्षिणेस-२० फुट रूंद रस्ता ,उत्तरेस-रविनगर आहे

**क्षेत्रिय अधिकारी**
**क्षेत्रिय कार्यालय क्र.६ सिकडो**
**नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका**

स्थलांतर
सिटी मॅक्स डिजिटल कलर
मो.7058766021,9422185282
गड्डम मार्केट, पहिला मजला,
शिवाजी नगर, नांदेड

गोदातीर समाचार

पेस्टोमॅटीक कंट्रोल सर्व्हीस
हर्बल ट्रिटमेंट
१६ वर्षापासून नांदेडकरांच्या सेवेत...
किडे, मुंग्या, मुंगळे, झुरळ, पाल, उंदीर, ढेकूण, साप, कबुतर, वाळवी, मधपोळे इत्यादींचा खात्रीशीर उपाय. कामाचा कुठलाही साईड इफेक्ट नाही. त्रास नाही, वास नाही.
पूर्णा रोड, बी.एस.एन.एल. ऑफिससमोर नांदेड
मो. 9284804221, 9637704308



# हरित नांदेड अभियानाला उत्साहात सुरुवात

## वृक्षलागवडीसाठी महानगरपालिका, सामाजिक संस्था व वृक्षमित्र फाउंडेशनचा पुढाकार

**नांदेड (प्रतिनिधी)–** गुरुव्दारा लंगर साहिबचे श्री बाबा हरीसिंघ, मनपा आयुक्त डॉ. महेशकुमार डोईफोडे व उपवनसंरक्षक केशव वाबळे यांच्या प्रमुख उपस्थितीत महानगरपालिका व वृक्षमित्र फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने जागतिक पर्यावरण दिनी विसावा उद्यानात हरित नांदेड अभियानास सुरुवात करण्यात आली.



मनपा आयुक्त डॉ.महेशकुमार डोईफोडे यांच्या संकल्पनेतून हरित नांदेड उपक्रमा अंतर्गत २०२४ च्या मान्सुन मध्ये शहरात २६ हजारांवर वृक्ष लागवड करण्यात येणार आहे. या अभियानाची सुरुवात पर्यावरण दिनाचे औचित्य साधुन दि. ५ जुन रोजी विसावा उद्यानात वृक्षारोपण करुन करण्यात आली आहे.

याप्रसंगी कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी मनपा आयुक्त डॉ.महेशकुमार डोईफोडे म्हणाले की, शहरामध्ये आज रोजी केवळ ३.१० लक्ष झाडे अस्तित्वात आहेत. आजमितीस शहरातील ८ लक्ष लोकसंख्या विचारात घेता आज आपण एक व्यक्ती एक झाड याप्रमाणे सुध्दा पुर्तता करण्यास कमी पडलो आहोत. त्यामुळे मोठ्या प्रमाणात वृक्ष लागवड करण्यासाठी हरित नांदेड अभियानात जास्तीत जास्त सहभाग घ्यावा,असे आवाहन केले.

या कार्यक्रमास प्र.अतिरिक्त आयुक्त तथा उपआयुक्त सुप्रिया टवलारे, उपआयुक्त नितीन गाढवे, वनपरिक्षेत्रिय अधिकारी चव्हाण, मुख्य उद्यान अधिक्षक डॉ. मिर्झा फरहतुल्ला बेग, सहाय्यक आयुक्त मो. गुलाम सादीक, क्षेत्रिय अधिकारी रावण सोनसळे, रमेश चवरे, राजेश जाधव यांची उपस्थिती होती.

याप्रसंगी हरित नांदेड अभियाना संदर्भात महानगरपालिकेच्या नियोजनाची भुमिका व प्रास्ताविक उद्यान अधिक्षक डॉ.फरहतुल्ला बेग यांनी केले. उपस्थितांना पर्यावरण संवर्धनाची शपथ ब्रम्हकुमारी स्वाती बहेनजी यांनी दिली. वृक्षमित्र फाउंडेशनचे संतोष मुगटकर यांनी सूत्रसंचालन केले.

या अभियानामध्ये सामाजिक संस्था वृक्षमित्र फाउंडेशनचे संतोष मुगटकर, रोटरी क्लबचे, वासवी क्लब, गोदावरी नदी संसद, ऑल इंडीया रिन्युवेबल एनर्जि असो., नांदेड जनरल ट्रेडर्स असोसिएशन, लॉयन्स प्राईड नांदेड, मेथेडिस्ट मेन्स-मेथेडिस्ट चर्च, श्री दत्तकृपा सेवाभावी संस्था वाघाळा, महाराष्ट्र आर्यवैश्य महिला महासभा, राऊ प्रतिष्ठाण हडको, ज्ञान संवर्धन शिक्षण प्रसारक मंडळ धुप्पा, नायगाव, अग्रवाल महिला मंडळ, श्री संत ज्ञानेश्वर सेवाभावी संस्था, ब्रम्हकुमारीज वसंतनगर, गार्गी संस्कार केंद्र, नांदेड ब्लॉगर्स ग्रुप, मातृसेवा संघ, नांदेड, ऑक्सफर्ड इंटरनॅशनल स्कुल, आर्य वैश्य शिक्षक संघ, अग्रसेन समिती, नांदेड, फिंगर प्रिंट प्रि स्कूल, लायन्स क्लब एंजल्स, नांदेड इत्यादी संस्था सक्रिय सहभागी असणार आहेत.

# अजित पवार यांनी राज्याच्या तिजोरीवर दरोडा टाकला –गणेश हाके

**नांदेड (प्रतिनिधी)–** गावगाडातल्या ओबीसी भटक्या विमुक्त जातींसह इतर मागासवर्गीय गोरगरिबांचे पैसे पळविण्याचे पाप अर्थमंत्री अजित पवार करीत असल्याचा आरोप ओबीसी नेते लक्ष्मण हाके नांदेडमध्ये पत्रकारांशी बोलताना केला.



ते म्हणाले की, अमोल मिटकरीने मला काय म्हणायचे ते म्हणू द्या, बावळट म्हणू द्या, वायझेड द्या, परंतु मी ओबीसींची लढाई लढत राहणार आहे. भटक्या विमुक्त ओबीसींच्या प्रश्नांसाठी आम्ही वेळ पडली तर रस्त्यावर उतरू आणि अमोल मिटकरींनी आम्हाला एक शिवी दिली तर आम्ही दहा शिव्या देऊ, पण ओबीसींचे, भटक्या विमुक्तांचे प्रश्न उपस्थित करतच राहणार असल्याचंही लक्ष्मण हाकेंनी सांगितले. आम्हाला आडवी भाषा करणाऱ्यांनी आम्हाला अडवून दाखवावे, असे आव्हान त्यांनी दिले.

देशात लोकशाही आहे, इथं काठ्या, कुऱ्हाडांची लढाई नाही. विचारांची लढाई आहे. ते म्हणतात महाराष्ट्रात फिरू देणार नाही, रस्त्यावर फिरू देणार नाही, आम्हीही पाहू आम्हाला ते कुठे अडवतात, असंही हाके म्हणालेत. मला एकानं गाडी गिफ्ट दिली होती, माझ्या जुन्या गाडीला खूप मेंटेनन्स होता. लोकांनी गाडी दिल्यानंतर त्याचदरम्यान सारथीला निधी उपलब्ध होतो. महाज्योतीला दुजाभाव केला जातो म्हणून मी अर्थमंत्री यांना उद्देशून एक प्रेस घेतली, त्यानंतर अमोल मिटकरी यांनी माझ्या गाडीचा नंबर वायझेड ठेवा, अशा पद्धतीचे वक्तव्य केले होते. आता मी अमोल मिटकरी यांच्या गावात जाणार असून, अजित पवारांची पोलखोल केल्याशिवाय राहणार नसल्याचेही हाके म्हणालेत. मी काही पवार कुटुंबासारखा व्यापारी नाही, माझा कुठं कारखाना नाही, रोहित पवार सारखं माझ्याकडे बारामती ॲग्रो नसल्याचीही त्यांनी टीका केली आहे.



**नांदेड** : विश्व पर्यावरण दिनानिमित्त भाजपच्यावतीने छत्रपती शिवाजीनगर मंडळ अंतर्गत पारसनगर बालाजी मंदिर परिसरात महानगर अध्यक्ष अमरनाथ राजूरकर यांच्या प्रमुख उपस्थितीत वृक्षारोपण करण्यात आले. यावेळी विजय येवनकर, नागनाथ गड्डम, बालासाहेब देशमुख लहानकर, पुंजाजीराव कल्याणकर, रमेश रायवार, धानोरकर काका, आराळीकर काका, मनोजराज भंडारी, संतोष मानधने, राजू देशमुख, संतोष कल्याणकर, अमित वाघ, उदय रायवार, स्वप्नील देशमुख, संदीप तोकलवाड, अनिल जाधव, प्रमोद गुरू आलेगावकर, अभिजीत संगेवार, चंद्रकांत लहानकर आदी दिसत आहेत. (छाया : सचिन डोंगळीकर)

# अवैध कत्तलीसाठी जाणाऱ्या १५ बैलांची सुटका; मुदखेड आणि ग्रामीण ठाण्यात गुन्हा दाखल

**नांदेड (प्रतिनिधी)–** पोलिसांची नजर चुकवून चोरीच्या मार्गाने जनावरांची तस्करी सुरू आहे. पोलिसांनी अशाच तस्करीविरुद्ध कारवाई करून मुदखेड आणि नांदेड ग्रामीण ठाण्याच्या हद्दीतून १५ गोवंश जप्त केले आहेत. स्थागुशाचे पोलीस निरीक्षक उदय खंडेराय यांचे सहकारी अधिकारी पोलीस उपनिरीक्षक मिलींद सोनकांबळे, महेश कोरे व त्यांच्या पथकातील अंमलदारांनी दि. ५ रोजी मिल्लतनगर

येथून एका वाहनातून (एमएच २६ बीई ३३९८) कत्तलीसाठी नेण्यात येणारे गोवंशाचे १५ जनावरे पकडण्यात आली. या जनावरांचे वाहन नांदेड पोलीस स्टेशनच्या ताव्यात देण्यात आले. पोउपनि मिलींद सोनकांबळे यांच्या तक्रारीवरून वाहनासह दोन व्यक्ती व वाहन मालकावर गुन्हा नोंद करण्यात आला आहे.तसेच दि. ५ जून रोजी मुदखेड मधील कुरेशी मोहल्ला येथून सात जनावरे पकडण्यात आली. पोउपनि महेश कोरे यांचे रिपोर्टवरून मुदखेड ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.




**नांदेड** : राष्ट्रवादी कॉंग्रेस शहर जिल्हाध्यक्ष जीवन घोगरे पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त अभिष्टचिंतन करण्यात आले. यावेळी माजी उपमहापौर सरजितसिंघ गिल, तेजविरसिंघ ढाकणीवाले, ॲड. संघरत्न गायकवाड, फेरोज पटेल, दिपक पावडे, बाळासाहेब बोकारे, भारत काकडे, विलास गजभारे, दत्ता पाटील तळणीकर, सय्यद मौला, संदीप बेटमोगरेकर, संतोष पाटील, कामाजी पाटील, प्रमोद देशमुख, आनंद टिपरसे, सिद्धांत भोकरे, विलासदादा गजभारे, उषाताई मोरे, सम्राट आढाव, एकनाथ वाघमारे, बि.के. कांबळे, प्रसेजजित वाघमारे, आकाश सोनकांबळे, प्रदीप हानवते, माधव कदम, रमेश कदम, शंकर भेडीकर आदी दिसत आहेत. (छाया : करणसिंह बैस)

# आज लोहा येथे शिवराज्याभिषेक दिनानिमित्त कार्यक्रमाचे आयोजन

**लोहा (प्रतिनिधी)–** येथील वीर माधवराव नळगे शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत ६ जून रोजी सकाळी १०:३० वाजता शिवराज्याभिषेक दिनाच्या निमित्त एका कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

कौशल्य रोजगार उद्योजकता व नाविन्यता मंत्री मंगल प्रभात लोंढा यांच्या संकल्पनेतून मा. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते आभासी पध्दतीने (व्हिडीओद्वारे ऑनलाईन) कार्यक्रमाचे उद्घाटन करण्यात येणार आहे. या संस्थेत होणाऱ्या सदर कार्यक्रमास प्रमुख अतिथी म्हणून गट शिक्षणाधिकारी सतीश व्यवहारे यांची उपस्थिती असणार आहे. प्रमुख वक्ते म्हणून ॲड. चंद्रकांत पत्की यांचे 'नागरिक कर्तव्य व शिष्टाचार' विषयावर मार्गदर्शन होणार आहे.

# अशोक साखरे यांचे निधन

**नायगाव (प्रतिनिधी)–** नरसी येथील ज्येष्ठ नागरिक अशोक बसवंतराव साखरे (वय ६५) यांचे दि.४ रोजी दुपारी ३ वाजता निधन झाले.



त्यांच्यावर गुरुवारी सकाळी ११ वाजता नरसी येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, दोन मुली, सुना, जावई, नातू असा परिवार आहे. राजेश साखरे व श्रीपत साखरे यांचे वडील तर सामाजिक कार्यकर्ते शुभम साखरे यांचे ते काका होत.




**नांदेड** : पीपल्स रिपब्लिकन पाटीचे प्रदेश महासचिव बापूराव गजभारे यांच्या वाढदिवसानिमित्त रयत रूग्णालयात बेडशिट देऊन फळे वाटप करण्यात आली. यावेळी भदंत पैय्याबोधी, डॉ. सुरेख खुरसाळे, जिल्हाध्यक्ष विनोद भरणे, डॉ. एस.एम. पाटील, सतिश पांडवे, साहेबराव सोनकांबळे, आकाश गजभारे, सचिन मांजरमकर, डॉ. माधव बसवंते, साहेबराव चित्ते, प्रविण हाटकर, संदीप गजभारे आदी. (छाया : करणसिंह बैस)

# लाचप्रकरणी दोन्ही तलाठी महिलांची रवानगी कारागृहात

**नांदेड (प्रतिनिधी)–** वडीलोपार्जित शेती तक्रारदाराने त्याच्या पत्नीच्या नावाने लावण्यासाठी १६ हजार रुपयांची लाच स्विकारणाऱ्या दोन महिला तलाठ्यांची गुरुवारी पोलीस कोठडी संपली. त्यानंतर दुसऱ्या विशेष जिल्हा न्यायाधीशांनी त्यांना न्यायालयीन कोठडीत पाठविले आहे.

जमीनीतील काही हिस्सा पत्नीच्या नावाने करण्यासाठी भाग्यश्री भिमराव तेलंगे (वय ३४) सज्जा निचपुर तसेच सुजाता शंकर गवळे (वय २५) तलाठी सज्जा कनकवाडी ता. किनवट रा. एकतानगर गोकुंदा यांनी तक्रारदाला लाच मागितली होती. शेवटी १६ हजार रुपये घ्यायचे ठरले. ही सर्व पडताळणी वॉईस रेकॉर्डमध्ये नोंद झाली आहे. लाच लुचपत प्रतिबंधक विभागाने दोन्ही महिला तलाठ्यांना अटक केली. बुधवार दि. चार जून रोजी न्यायालयात हजर केले. दुसरे अतिरिक्त सत्र न्यायाधीशांनी त्यांना ५ जूनपर्यंत पोलीस कोठडी दिली होती. गुरुवारी लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने या दोन्ही महिला तलाठ्यांना न्यायालयीन कोठडीत पाठविण्याचा अर्ज आणला होता. तांत्रिक सर्व बाबी तपासून न्यायालयाने या दोन्ही महिला तलाठ्यांना जामीन दिला नाही. त्यामुळे त्यांचा मुक्काम कारागृहात राहणार आहे.

# डी.पी.सावंत यांच्या हस्ते 'अभ्यासपूरक' पुस्तकाचे विमोचन



**नवीन नांदेड (प्रतिनिधी)–** श्री शारदा भवन एज्युकेशन सोसायटी संचालित इंदिरा गांधी वरिष्ठ महाविद्यालय सिडको नांदेड येथे संस्थेचे सचिव आणि महाराष्ट्र राज्याचे माजी उच्च शिक्षण राज्यमंत्री डी. पी. सावंत यांच्या हस्ते 'अभ्यासपुरक' पुस्तकाचे प्रकाशन करण्यात आले.

प्रा. डॉ. राजकुमार पवळे व प्रा. डॉ. भागवत पस्तापुरे लिखित 'पर्यावरण जागृती' तसेच डॉ.प्रा मिलिंद लोखंडे व डॉ. प्रा. उमेश सिंह बैस लिखित 'ॲनिमल डायव्हर्सिटी व टेक्स्ट बुक ऑफ बायोडायव्हर्सिटी ऑफ कोरडेट' या पुस्तकाचे विमोचन करण्यात आले. या पुस्तकांचा फायदा बहुसंख्य विद्यार्थी घेतील असा आशावाद डी.पी. सावंत यांनी यावेळी व्यक्त केला.

याप्रसंगी संस्थेचे सहसचिव प्राचार्य रावसाहेब शेंदारकर आणि प्राध्यापक भोपाळकर उपस्थित होते. पर्यावरण जागृती' तसेच ॲनिमल डायव्हर्सिटी व टेक्स्ट बुक ऑफ बायोडायव्हर्सिटी ऑफ कोरडेट' ही दोन्ही पुस्तके विज्ञान शाखेची आहेत. पण इतर शाखेच्या विद्यार्थ्यांसाठी जेनेरिक म्हणून शिकता येतील. तसेच ही दोन्ही पुस्तके अभ्यासक्रमावर आधारित आहेत, अशी माहिती लेखकांनी सांगितली. तसेच प्राध्यापकपदी पदोन्नती झाल्याबद्दल डॉ. राजकुमार पवळे, प्रा. मिलिंद लोखंडे आणि डॉ. उमेश बैस यांचा सत्कार करण्यात आला. याप्रसंगी प्राचार्य डॉ. दुर्गेश रवंदे व प्राध्यापक उपस्थित होते. प्रा. डॉ. एल. टी. काळे यांनी या कार्यक्रमाचे सुरेख सूत्रसंचालन केले.

# ज्येष्ठ शिवसैनिक विठ्ठलराव शेटकर यांचे निधन

**लोहा (प्रतिनिधी)–** ज्येष्ठ शिवसैनिक तथा महाराष्ट्र राज्य जलसंधारण समितीचे सदस्य व माजी जि. प. सदस्य विठ्ठलराव शेटकर यांचे गुरुवारी दि. ५ रोजी ह्दयविकाराच्या तीव्र झटक्याने निधन झाले. त्यांच्या पार्थीवदेहावर शुक्रवारी दि. ६ रोजी दुपारी १२ वाजता त्यांच्या मूळगावी सावरगाव (न.) येथे अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, एक मुलगी, सुना, नातवंड असा मोठा परिवार आहे. त्यांच्या निधनाने राजकारणातील एक सक्रिय व्यक्तिमत्त्व,जनतेच्या हाकेला नेहमीच ओ देणारा, गोरगरीबांचा आवाज हरपला आहे. विठ्ठलराव शेटकर हे अतिशय अभ्यासू, मनमिळावू आणि सर्वसामान्य जनतेसाठी नेहमी झटणारे लोकप्रिय नेतृत्व होते. त्यांच्या जाण्याने सामाजिक व राजकीय क्षेत्रात मोठी पोकळी निर्माण झाली असल्याचे माजी आमदार रोहिदास चव्हाण यांनी दुःख व्यक्त केले आहे.



# दारूच्या जुन्या वादातून खून करणाऱ्या दोघांना जन्मठेप

## बिलोली अतिरिक्त जिल्हा सत्र न्यायालयाचा निकाल

**बिलोली (प्रतिनिधी)–** दारूच्या जुन्या वादातून मंडगी (ता. देगलूर) येथील दोघांनी गावातीलच मारोती नागोराव जाधव यांचा खून केला होता. या प्रकरणी बिलोली येथील अतिरिक्त जिल्हा सत्र न्यायालयाचे न्यायाधीश दिनेश ए कोठलीकर यांनी दि.५ जुन रोजी दोघांना जन्मठेप व १० हजार रुपये दंडाची शिक्षा सुनावली आहे.

देगलूर तालुक्यातील मंडगी येथील रहिवासी मारोती नागोराव जाधव यांचे गावातील मल्लिकार्जुन लोणे व श्रीनिवास लोणे यांच्या सोबत मैत्री होती. मारोती जाधव यास श्रीनिवास लोणे यांनी दारुसाठी पैसे मागितले पण मारोती जाधव याने दिले नाही. त्यातून त्यांच्या वाद झाला. याचा राग मनात धरून दि.२९ जुलै २०२३ रोजी सायंकाळी मल्लिकार्जुन लोणे व श्रीनिवास लोणे यांनी मारोती जाधवला घराबाहेर नेले. बराच वेळ झाला भाऊ घरी न आल्याने शैलेंद्र जाधव यांनी मारोतीची चौकशी केली. दुसऱ्या दिवशी दि. ३० जुलै २०२३ रोजी सकाळी मारोती जाधव सकाळी ७ वाजताच्या सुमारास मारोती जाधव हे मंडगी ते मंडगी फाटा दरम्यान एका शेता जवळ मृतावस्थेत दिसून आला. शैलेंद्र जाधव यांच्या तक्रारीवरून देगलुर ठाण्यात गुन्हा दाखल झाला. तपास होऊन दोषारोप न्यायालयात सादर झाले. याप्रकरणी ११ साक्षीदार तपासले गेले. साक्षी पुरावे व सरकारी अभियोक्त्यांचा युक्तिवाद ऐकून बिलोली येथील अतिरिक्त जिल्हा सत्र न्यायालयाचे न्यायाधीश दिनेश ए कोठलीकर यांनी दि. ५ जुन २०२५ रोजी आरोपी श्रीनिवास लोणे व मल्लिकार्जुन लोणे या दोघांस कलम ३०२ अंतर्गत जन्मठेप व कलम २०१ भादवी अंतर्गत १० हजार रुपये दंडाची शिक्षा सुनावली आहे. सदर प्रकरणी सहा. सरकारी अभिव्यक्ता संदीप कुंडलवाडीकर यांनी बाजू मांडली तर पैरवी अधिकारी म्हणून माधव गंगाराम पाटील यांनी काम पाहिले.

**Godateer Samachar** हे पत्र गोदातीर मीडिया नेटवर्ककरिता मुद्रक, प्रकाशक, संपादक केशव मधुकरराव घोणसे पाटील यांनी सेवा कम्युनिकेशन, १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे मुद्रित करुन १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे प्रकाशित केले. **संपादक** केशव मधुकरराव घोणसे पाटील.
फोन नं.(०२४६२) २५५७७७/फॅक्स नांदेड-(०२४६२) २५२२११ / लातूर (०२३८२)२५७४७४ / मुंबई ९९६७०६२३५४
ईमेल: godateer@gmail.com, keshavgpatil@gmail.com